JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

CREDAI AHILYANAGAR पुर्ण करा आपल्या वास्तुचे स्वप्न!!
CREDAI AHILYANAGAR Mega Property EXPO 2024 with home bring happiness..
TITLE SPONSOR - SBI
शुक्र शनि रवि
१८ १९ २०
ऑक्टोबर
स्थळ: सारडा कॉलेज ग्राउंड, पत्रकार चौक, सावेडी, अहिल्यानगर

Volume - 73 | Issue- 54 | Marathi Daily | Saturday 19/10/2024 | Pages - 8 | Price- Rs. 3

# 'व्यक्ती' गेली पण 'वल्ली' राहणार..!




**इयत्ता पाचवीत असताना जाहिरात पाहिली, व्ही. शांताराम यांच्या चित्रपटासाठी बाल कलाकार पाहिजे. ती पाहून छबिलदास विद्यालयात स्क्रीन टेस्टिंगसाठी गेला, टेस्ट घेत होत्या सुलभा देशपांडे. स्क्रीन टेस्टमध्ये निवड झाली आणि थेट चित्रपटात काम मिळालं. त्यानंतर दूरदर्शन आणि मग मालिका असा उलटा प्रवास करणारा एकमेव अभिनेता म्हणजे अतुल परचुरे. १४ ऑक्टोबरला त्याचं निधन झालं, जे उभ्या महाराष्ट्राला चटका लावून गेलं. त्या अभिनेत्याच्या कार्याचा आढावा घेणारा हा श्रद्धांजलीपर लेख.**



विविध विशेष
ज्ञानेश कुलकर्णी

जन्मापासून दादरला राहणारा. एका बाजूला शिवाजी पार्क तर दुसऱ्या बाजूला शिवाजी मंदिर, त्यामुळे क्रिकेट आणि नाटक यांची आवड असणे हे ओघानंच आलं. त्यात बालमोहन शाळेत शिकल्यामुळे भाषा आणि वाणी ही तावूनसुलाखून तयार झालेली. खरं तर अतुलला लहानपणी क्रिकेटर व्हायचं होतं, पण त्यानं स्वतःला वेळेवर ओळखलं की बॅटिंग जरी चांगली करत असलो तरी क्रिकेटर व्हायला तेवढं पुरेसं नाही. त्यामुळे त्याने करिअरदेखील स्वतः ला ओळखूनच निवडलं. अभ्यासात चांगला, दहावीची गुणवत्ता यादी अगदी काही गुणांनी हुकलेली तरीही आपली आवड अभ्यास नसून अभिनय आहे हे त्यानं ओळखलं आणि त्याप्रमाणे मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली. आज प्रत्येकाला नक्कीच पटेल की त्याचा निर्णय योग्यच होता. वयाच्या अवघ्या १० व्या वर्षी चित्रपटातून केलेली सुरुवात आणि त्यानंतर लगेचच मुंबई दूरदर्शनच्या किलबिल या कार्यक्रमात सादर केलेल्या रंगछटा यामुळे अगदी लहानपणापासूनच कॅमेराची किंवा



रंगमंचाची भीती राहिली नाही. अतुलने एका मुलाखतीत सांगितले होते की, ते खरं तर कॅमेराची भीती बाळगण्याचं वयच नव्हतं. पण खऱ्या अर्थाने अभिनयाचा प्रवास सुरू झाला तो 'बजर बट्टू' या बालनाट्यापासून. त्यात अतुलची प्रमुख भूमिका होती. पूर्ण अडीच तासाच्या या बालनाट्याचे त्याकाळी १०० पेक्षा जास्त व्यावसायिक प्रयोग झाले. त्यानंतर अकरावीत असताना अतुलला एक नाटक मिळालं जे त्याच्या आयुष्यातील महत्वाचे होते, ते म्हणजे विश्राम बेडेकर लिखित, दिग्दर्शित 'टिळक आणि आगरकर'. नाटक लोकमान्य टिळक आणि समाज सुधारक आगरकर यांच्या वैचारिक संघर्षावर आधारित असल्याने अर्थातच नाटकातील भाषा अत्यंत उच्च दर्जाची होती. अतुलची भाषेवर चांगली पकड होती, **(पान २ वर)**

॥ श्री ॥
दिवाळी फराळ
५१ वर्षांची परंपरा जपत शुद्ध, पौष्टिक, पारंपारिक व घरगुती पद्धतीने बनविलेले फराळाचे पदार्थ..
सच्चिदानंद केटरर्स
प्रोप्रा. नरेंद्र कुलकर्णी
9822771199, 9420796195
शमी गणपती मंगल कार्यालय, दिल्लीगेट, अ.नगर

– पाहिजेत –
सिव्हिल इंजिनिअर – २ जागा
(२–३ वर्ष अनुभव असल्यास प्राधान्य)
साईट सुपरवायझर – २ जागा
(२–३ वर्ष अनुभव असल्यास प्राधान्य)
गौरी इन्फ्रास्ट्रक्चर अहिल्यानगर
* संपर्क * 9595785290

फराळ आमचा,आनंद तुमचा
अतुट विश्वासाची स्वादमय परंपरा...
हेमराज
दिवाळी फराळ महोत्सव
कोठी रोड, अहिल्यानगर.
Mob.: 99215 99216 | 9890298899

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



**'नियोजन' अर्थसंकल्पाचा आढावा, जागतिक मंदी यावरच्या महाचर्चेत लोक काय बोलतायत? हे ऐकायला गेलाय इथला नेहमीचा भिकारी!!**

सुविधा नाहीत.. कर भरून फायदा काय?

# शहरातील समस्या ठरणार निवडणुकीत कळीचा मुद्दा

**समाचार/नगर-दि.१९**

नगर शहराचा गेल्या काही वर्षात विस्तार वाढला असताना समस्यादेखील तितक्याच वाढल्या आहेत. नियमीत कर भरूनही नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याची ओरड होत आहे. यातील सर्वात महत्वाची समस्या म्हणजे शहरातील सर्व रस्त्यांवरील अतिक्रमणांची झाली आहे. रस्ते आणि फूटपाथही अतिक्रमणाने गिळले असून शहरातील प्रत्येक रस्त्यावर अतिक्रमण आहे. या अतिक्रमणामुळे दररोज वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून कारवाई केल्यानंतरही राजकीय वरदहस्तामुळे पुन्हा हे अतिक्रमण धारक बस्तान मांडत असल्याचे नगरकर पाहत आहेत. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा महत्वाचा ठरण्याची शक्यता आहे. काही महत्वाचे रस्ते वगळता गल्लोगल्लीतील रस्त्यांची **(पान ३ वर)**

### पाणी मुबलक, तरीही समस्या गंभीर

नगर शहराला मुळा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मुळा धरणात पाणी मुबलक असतानाही नगर शहर व उपनगरांना कायमच पाण्याच्या समस्याचा सामना करावा लागतो. नगरकरांना मुबलक पाणी मिळण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे नियोजनाचा अभाव आहे. शहर तसेच उपनगरीय भागात तीन– चार दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. मुळा धरणात भरपूर पाणीसाठा असल्याने दररोज पाणीपुरवठा करावा, अशी नगरकरांची अपेक्षा आहे. उपनगरीय भागात नव्याने विकसीत झालेल्या वसाहतींमध्ये तर महापालिकेकडून अजून नळ कनेक्शन देखील पोहोचले नाही. मोठा खर्च करून फेज टू पाणी योजना झाली. मात्र, नगरकरांची पाण्याची उपेक्षा अजून कायम आहे.

## अजित पवार गटाची जाहीरनामा समिती जाहीर

नगर, दि.१९– विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जाहीरनामा समिती गठीत केली असूनी तिची घोषणा आज करण्यात आली आहे. मंत्री दिलीप वळसे पाटील हे या समितीचे अध्यक्ष आहेत. आ. शिवाजी गर्जे हे निमंत्रक आहेत. मंत्री धनंजय मुंडे, अनिल पाटील, नरहरी झिरवळ, आदिती तटकरे, समीर भुजबळ, इद्रिस नायकवडी, अविनाश आदीक, रूपाली चाकणकर, वैशाली नागवडे, रूपाली ठोंबरे, सूरज चव्हाण, नजीब मुल्ला, कल्याण आखाडे, सुनील मगरे, संजय मिस्कीन, आनंद परांजपे यांचा या समितीत समावेश आहे.

महायुती जागावाटपावर दिल्लीत शिक्कामोर्तब

# भाजपा १५५, शिवसेना ७८ तर राष्ट्रवादीला ६० जागा!

**मुंबई, दि. १९–** विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या जागावाटपावर अखेर नवी दिल्लीत शिक्कामोर्तब झाले असून त्यानुसार महायुतीत भाजपा १५५ पेक्षा अधिक जागा लढणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ७० ते ७८ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ५५ ते ६० जागा मिळणार असल्याचे सांगण्यात आले. महायुतीच्या जागावाटपावर काल शुक्रवारी रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत बैठक झाली. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. यावेळी झालेल्या चर्चेत महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरविण्यात आला. **(पान ३ वर)**

## निवडक

### ठाकरे- काँग्रेस वादावर चेन्नीथला यांची शिष्टाई



**मुंबई, दि.१९–** ठाकरेंच्या शिवसेनेला विदर्भात काही जागा हव्या आहेत. पण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले त्या सोडायला तयार नसल्याचे सांगितले जाते. याबद्दलची नाराजी खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केली. त्यानंतर पटोलेंनी राऊतांना उपरोधिक भाषेत सुनावले. यामुळे ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये जागावाटपासाठी वाद सुरू असल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला हे सकाळी ११ वाजता मातोश्रीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. नाना पटोले आणि ठाकरे गटाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत आहे. विदर्भातील जागावाटपावरुन नाना पटोले आणि ठाकरे गटात काही दिवसापासून वाद सुरू असल्याचे बोलले जात आहे. या बैठकीत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मनपा अधिकारी-कर्मचाऱ्यांचा निवडणुकीत सहभाग नको- आयुक्त

# फौजदारी आणि बडतर्फीच्या कारवाईचा इशारा

**समाचार/नगर-दि.१९**

विधानसभा निवडणुकीच्या राजकीय कार्यक्रम व प्रचारात मनपाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभागी होऊ नये. अधिकारी किंवा कर्मचारी निवडणूक प्रचारात सहभागी असल्याचे आढळल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ नुसार कोणतीही नोटीस न देता फौजदारी स्वरूपाची व मनपा सेवेतून बडतर्फीची कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला.

याबाबत आयुक्त डांगे यांनी सर्व विभागप्रमुख व अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना आदेश काढले आहेत. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मधील कलम ५ नुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला, कोणत्याही राजकीय पक्ष किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही किंवा त्याच्याशी अन्य प्रकारे संबंध ठेवता येणार नाही, अशी तरतूद आहे. कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करू शकणार नाही किंवा हस्तक्षेप करू शकणार नाही, त्यात भाग **(पान ३ वर)**




# अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या दोघांवर पोलिसांची कारवाई

**समाचार/नगर-दि.१९**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर शहर पोलिसांनी अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. गुरूवारी (१७ ऑक्टोबर) कोतवाली व तोफखाना पोलिसांनी कारवाई करून तलवार, गावठी कट्टा व जिवंत काडतुसे जप्त केले आहेत. या प्रकरणी संबंधीत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अंमलदार शिरीष तरटे यांच्या फिर्यादीवरून रियाज मुस्ताक सय्यद (वय ३०, रा. जुना बाजार, ख्रिस्ती गल्ली) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार दत्तात्रय जपे, सुनील शिरसाठ, अहमद इनामदार, दत्तात्रय कोतकर, सतीष भवर, बाळासाहेब भापसे यांच्या पथकाने गुरूवारी रात्री सव्वा नऊच्या सुमारास बालिकाश्रम रस्त्यावरील पंपींग स्टेशन जवळ ही कारवाई केली. अधिक तपास उपनिरीक्षक पाटील करत आहेत.




पोलीस अंमलदार सचिन लोळगे यांच्या फिर्यादीवरून करणसिंग रघुविरसिंग जुनी (वय २४ रा. संजयनगर, काटवण खंडोबा, अहिल्यानगर) याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून एक स्टिलची तलवार जप्त केली आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुरूवारी रात्री पावणे नऊच्या दरम्यान आयुर्वेद कॉलेज चौक, काटवण खंडोबाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ही कारवाई केली. अधिक तपास पोलीस अंमलदार राजेंद्र पालवे करत आहेत.

भावपूर्ण श्रध्दांजली !
तुझे संस्कार व शिकवण
आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील...



स्व.सौ. गुलाबबाई अमृतलाल मुथा
स्व. दि. १८ ऑक्टोबर २०२४

प्रार्थना सभा
स्व. सौ. गुलाबबाई अमृतलाल मुथा
यांचे दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुःखद निधन झाले
प्रार्थना सभा सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी
दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत होणार आहे.
स्थळ : केशर गुलाब मंगल कार्यालय, स्टेशन रोड, अहिल्यानगर

• शोकाकुल •
अमृतलाल मुथा
सीए आयपी अजय मुथा, आशिष मुथा
ॲड. अमित, डॉ. अनुज, सीए आदेश, आदर्श
समस्त मुथा परिवार

(पान १ वरुन)

# ‘व्यक्ती’ गेली पण ‘वल्ली’ राहणार..!

त्याची वाणी अत्यंत स्पष्ट होती. त्याचे श्रेय तो नेहमीच त्याच्या बालमोहन शाळेला द्यायचा. केवळ एका ओळीच्या संवादावरून विश्राम बेडेकर यांनी अतुलची नाटकासाठी निवड केली. आगरकरांचा पुतण्या नारायणाची भूमिका त्याने केली. ते नाटक खूप गाजले. मराठी नाट्यसृष्टीच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरात लिहिले गेलेले ते एक नाटक आहे. ‘टिळक आणि आगरकर’ हे नाटक जरी गंभीर असले तरी अतुलचा मूळ स्वभाव मिश्किल आणि विनोदी. त्याच भूमिकांसाठी तो प्रेक्षकाच्या जास्त स्मरणात राहिला. लहानपणी प्रत्येक गल्लीत एक गोबऱ्या गालाचा, सुदृढ शरीरयष्टीचा, मनात अढी न ठेवता सगळ्यांशी मैत्री करणारा, काहीसा बाळबोध पण मिश्किल आणि पँटीचे खिसे आणि तोंड कायम खाऊने भरलेला खुशालचेंडू एक मित्र असायचा. साधारणपणे ढंप्या किंवा गोट्या अशा टोपण नावाने ओळखला जाईल अशा व्यक्तिमत्त्वाचा. अतुलचे व्यक्तिमत्व अगदी त्या ढंप्या किंवा गोट्याला साजेसं असंच होतं. मनमोकळा, खुशालचेंडू, सगळ्यांशी आगत्याने बोलणारा, वागणारा आणि खाण्यावर नितांत प्रेम करणारा. अतुलचे हे व्यक्तिमत्व पहिल्यांदा पाहायला मिळालं ते १९८९ साली विनय आपटे दिग्दर्शित मुंबई दूरदर्शनवर आलेली एक मराठी मालिका ‘चाळ नावाची वाचाळ वस्ती’ यामध्ये. काहीसा वेंधळा, हाफ पॅन्टीत चाळीतील प्रत्येकाची कामे करणारा काहीसा परोपकारी गंपू. त्या मालिकेत अतुलला पहिल्यांदा पाहिलं आणि तेव्हापासूनच त्याचा अभिनय आवडत गेला. त्या मालिकेत त्याच्याबरोबर संजय मोने होते आणि कदाचित तेव्हापासूनच त्या दोघांची घट्ट मैत्री झाली ती शेवटच्या क्षणापर्यंत. झी गौरव पुरस्कारप्रसंगी संजय मोने अतुलविषयी म्हणाले होते की, त्याच्या अभिनय क्षमतेमुळे आम्ही त्याला ‘साहेब’ म्हणतो परंतु ज्या पद्धतीने त्याने कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराशी लढा दिला ते पाहता त्याला सदैव ‘साहेब’च म्हणत राहू! अतुल गेला त्यावेळेस संजय मोने धाय मोकलून रडले होते.

अतुलच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचं नाटक म्हणजे ‘नातीगोती’. पौगंडावस्थेतील मतिमंद मुलगा आणि त्याचे आई – वडील यांच्या जीवनावर आधारित अंतर्मुख करायला लावणारं हे नाटक. १९८९ साली आलेल्या जयवंत दळवी लिखित या नाटकात अतुलने १६ वर्षांच्या मतिमंद मुलाची भूमिका केली होती. अतुलच्या अभिनयाचे खऱ्याअर्थाने कौशल्य आणि क्षमता या नाटकात पाहायला मिळाली. त्याची भूमिका व्याकूळ करणारी असून एका विशेष मुलाच्या मानसिकतेचा बारकाईने केलेला अभ्यास पदोपदी जाणवतो. त्यावर्षी जेव्हा अभिनयाच्या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले तेव्हा विक्रम गोखले यांच्यासारख्या दिग्गज अभिनेत्याने स्वतःचे नामांकन मागे घेत पुरस्काराचा खरा मानकरी अतुल असल्याचे जाहीर करून टाकले होते. ‘नातीगोती’ सारखे गंभीर नाटक जिथे गाजत होते तिथे दुसरीकडे अतुल ‘तरुण तुर्क म्हातारे अर्क’सारखे फार्सिकल नाटकदेखील करत होता. एकाच वेळी गंभीर आणि विनोदी भूमिका अशा परस्पर विरोधाभासाचे उदाहरण अतुलने दाखविले. यामध्येच त्याच्या अभिनयाचे श्रेष्ठत्व जगासमोर आले.

त्यानंतर ‘गेला माधव कुणीकडे’, ‘बे दुणे पाच’ आणि ‘व्यक्ती आणि वल्ली’ ही अतुलच्या आयुष्यातील महत्त्वाची नाटकं. पु.लं.च्या ७५ वी निमित्त ‘तुझं आहे तुझंपाशी’ नाटकाच्या प्रयोगात अतुलने श्यामची भूमिका केली तर गीताची भूमिका सोनालीने केली आणि ती जोडी पुन्हा ‘गेला माधव कुणीकडे’ पाहायला मिळाली आणि आयुष्यासाठी ते एकमेकांशी बांधले गेले. विनय येडेकरच्या जागी बदली अभिनेता म्हणून अतुल ‘गेला माधव कुणीकडे’मध्ये भूमिका केली पण त्याच्या आयुष्यात सोनालीची भूमिका कायमची फिट झाली. ‘व्यक्ती आणि वल्ली’ हे अतुलच्या आयुष्यातलं मैलाचा दगड ठरलेलं नाटक. अतुल लहानपणापासून पु.लं.चा फॅन होता. इतका की ‘व्यक्ती आणि वल्ली’ हे पुस्तक त्याचं पूर्णपणे तोंडपाठ होते. ज्यावेळेस हे नाटक करण्याचं ठरलं अतुलला मनोमन इच्छा होती की त्याच्यात काम करायला मिळावं पण त्याचं नशीब असं की लेखक, सूत्रधाराची म्हणजे प्रत्यक्षात पुलंची भूमिका त्याला करायला मिळाली, हे अतुल स्वतःचं मोठं भाग्य समजायचा. पुलंच्या हयातीत हे नाटक त्यांच्याचसमोर सादर करायला मिळणं ही अतुलच्या आयुष्यातील सर्वात मोठी उपलब्धी होती. ज्यावेळेस नाटक बसल्यानंतर पु.लं. स्वतः तालीम पहायला आले त्यांनी अतुलचं काम बघून तुला पाहून सतीशची आठवण होते, असे उद्गार काढले. दस्तूरखुद्द पु.लं.नी काढलेले हे उद्गार म्हणजे अतुलसाठी शाबासकीची थाप होती. नाटकात पेटी वाजवण्याचा एक प्रसंग होता, परंतु अतुलला पेटी तितकीशी जमली नाही म्हणून नाटक संपल्यानंतर पु.लं.नी स्वतः अतुल समोर बसून पेटी वाजवून दाखवली होती. दिलीप प्रभावळकर यांच्याबरोबरच वाह गुरू हे अतुलचं शेवटचं नाटक. दोघेही विनोदी कलाकार असून दोघांच्याही यात गंभीर भूमिका आहेत हे विशेष!


मराठी भाषेबरोबरच अतुलने हिंदी भाषेवरदेखील चांगले प्रभुत्व मिळवले होते. त्याची इच्छा होती की त्याच्या तोंडातून येणारे हिंदी हे एखाद्या हिंदी भाषिकासारखेच असावे. त्यासाठी त्याने विशेष प्रयत्न केले होते. त्याचीच फलश्रुती म्हणून १९९८ साली त्याला पहिला हिंदी सिनेमा मिळाला शाहरुख खानचा ‘फिर भी दिल है हिंदुस्तानी’. त्यानंतर एन. चंद्रा यांचा ‘स्टाईल’, ‘क्योंकी..’, ‘बिल्लू’, ‘ऑल द बेस्ट’ यासारखे हिंदी सिनेमे त्याने केले. सर्व चित्रपटातील अतुलची भूमिका ही वाखाणण्याजोगी होती परंतु हे सिनेमे म्हणावे तेवढे चालले नाहीत, याची अतुलला खंत होती. हिंदी सिनेमांमध्ये फार यश जरी मिळालं नसलं तरी हिंदी मालिकांमधून त्याला मोठं यश मिळालं. आर. के. लक्ष्मण की दुनिया, ‘यम है हम’ या मालिकांमधून अतुलला मोठी लोकप्रियता मिळाली. आर. के. लक्ष्मण यांच्या एका कार्टूनवर एक कथा असे जवळपास ४०० भाग या मालिकेचे झाले. ‘जागो मोहन प्यारे’ आणि पुढे ‘भागो मोहन प्यारे’ यातील अतुलची भूमिका देखील प्रेक्षकांची वाहवा मिळवून गेली. कपिल शर्मा शोमध्ये काम करणारा हा एकमेव मराठी कलाकार असावा. हे करत असतानाच भरत दाभोळकर यांच्या चार इंग्रजी नाटकातून देखील अतुलने भूमिका केल्या.

बालनाट्य, मालिका, चित्रपट अशा सर्वच माध्यमातून गंभीरपासून विनोदीपर्यंत भूमिका करताना अतुलने आपल्या अष्टपैलू अभिनयाची छाप सोडली. त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या जास्त लक्षात राहिल्या. दिलीप प्रभावळकर, संजय मोने, प्रशांत दामले, विनय येडेकर यांसारख्या दिग्गज अभिनेत्यांबरोबर त्याचे एक विशेष ट्युनिंग जुळले होते. संवादाच्या टायमिंगबरोबरच त्यांचे विनोद समजण्यासाठी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे. अभिनयासाठी भाषेचा उत्तम वापर करणाऱ्या पंक्तीमधील अतुल एक ज्येष्ठ अभिनेता होता. ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण दवणे अतुलाची तुलना ‘मेरा नाम जोकर’ मधील नायकाशी करतात. आपल्या वेदना झाकून ठेवत इतरांना हसत ठेवण्याचा वसा त्याने अखेरपर्यंत जपला. त्यामुळेच कॅन्सरसारख्या दुर्धर रोगावर त्याने दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर हसत हसत मात देखील केली. आजारातून उठल्यावर त्याने ‘सूर्याची पिल्ले’ नाटकाची तयारी देखील केली, परंतु काळाने त्याच्यावर झडप घातली. त्याच्या अकाली एक्झीटने संपूर्ण सिने–नाट्यसृष्टीवर शोककळा पसरली. सर्वसामान्य मराठी माणूस मनापासून हळहळला. ‘वाह गुरू’ या त्याच्या नाटकातील त्याची एक आवडती ओळ होती, ‘मृत्यू हा शेवट नसतो पण मृत्यू येतो तेव्हा आपण त्याला शेवट म्हणतो’. त्यामुळेच अतुलसारखा हरहुन्नरी कलाकार ‘व्यक्ती’ म्हणून आज जरी आपल्यात नसला तरी ‘वल्ली’ म्हणून सदैव आपल्या स्मरणात राहील. अतुलला समाचार परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

# दिवाळी - जाहिरातींचा सुगीचा काळ

## जाहिरात‘बाजी’

**ऑटोमोबाईल सेक्टर, रिअल इस्टेट आणि इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडस्च्या जाहिरातींचा मारा आता सर्वच माध्यमातून सुरु झाला आहे. म्हणजे दिवाळी आली आहे हे लक्षात येतं.**




देशभर सणासुदीचे वारे वाहते आहे. सगळीकडे फ्लॅश सेल किंवा शॉपिंग फेस्टिव्हल आयोजित केले जात आहेत. अशावेळी ऑटोमोबाईल सेक्टर, रिअल इस्टेट आणि इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडस् या सेगमेंटमधल्या जाहिरातींचे वादळ आले आहे. वर्षाचा या काळात बाजार, ग्राहकांच्या गर्दीने गजबजलेला असतो, तेव्हा ती गर्दी आपल्याकडेच वळावी यासाठी प्रत्येक ब्रँड प्रयत्नशील असतो. दसरा, दिवाळी आणि ख्रिसमस सारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर देशभर वर्तमानपत्रे, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि होर्डिंग्स आकर्षक अशा जाहिरातींनी सजलेली असतात.

ऑटोमोबाईल सेक्टरच्या जाहिराती या सगळ्या वातावरणात एक ब्रँड टोन सेट करतात. सणांच्या उत्साहाचे खरे सूचक म्हणून ऑटोमोबाईल क्षेत्राकडे पाहिले जाते. संपूर्ण महाराष्ट्रात, मुंबई, पुणे आणि नागपूरसारख्या गजबजलेल्या शहरांपासून ते अगदी ग्रामीण भागापर्यंत, ऑटो सेक्टरचे ब्रँडस् सणांचा फायदा घेण्यासाठी आक्रमक होतात. पारंपरिक आणि डिजिटल प्रकारातल्या जाहिरातींचे मिश्रण सध्या जोरात सुरु आहे. सवलती, फायनान्स स्कीम्स, लिमिटेड एडिशन मॉडेल अशा ऑफर्स ग्राहकांना आकर्षित करतात.

मारुती सुझुकी, टाटा मोटर्स आणि ह्युंदाई या प्रमुख ब्रँड्सने नव्या पिढीला आकर्षण वाटेल अशा जाहिराती करण्यावर भर दिला आहे. केवळ सवलती प्रमोट करून नाही तर कौटुंबिक गोष्टी, एकत्र येणे, राहणे जीवनशैली अपग्रेड करणे, मैत्री, पर्यटन अशा गोष्टी दाखवून जाहिराती केल्या आहेत. ज्या ग्राहकांना भावनिक आवाहनातून खरेदीकेंद्री बनवतात. मर्सिडीज आणि BMW सारखे प्रीमियम ब्रँड देखील आताशा छोट्या शहरांना टार्गेट करून सणासुदीच्या विशेष ऑफर देऊन आकर्षित करत आहेत. पावसाळ्यात कमी झालेल्या विक्रीनंतर ऑटोमोबाईल सेक्टरमध्ये जाहिरातींमध्ये वाढ झालेली दिसते.

रिअल इस्टेट हे क्षेत्र सणासुदीच्या काळात नेहमीच मोठ्या प्रमाणात बाजी मारून जाते. महाराष्ट्रातील रिअल इस्टेट क्षेत्र मार्केटिंगच्या प्रयत्नांमध्ये कधीच मागे हटत नाही. सातत्याने ब्रॅण्डिंग ॲक्टिव्हिटी करत, जाहिराती करत, वेगवेगळ्या स्कीम्स आणत त्यांचे प्रोजेक्ट्स चर्चेत ठेवतात. कधी स्टॅम्प ड्युटी नाही, तर कधी GST नाही, तर कधी कमी केलेले व्याजदर तर कधी आता बुक करा, नंतर पैसे द्या अशा ऑफर्सने मार्केट सजले आहे. ठाणे, नवी मुंबई आणि पिंपरी–चिंचवड सारख्या शहरांमध्ये, बांधकाम व्यावसायिक घर खरेदीदारांना आकर्षित करण्यासाठी कौटुंबिक भावनांनी ओतप्रोत असलेल्या जाहिराती करत आहेत.

डिजिटल प्लॅटफॉर्म, OOH प्रकारातल्या जाहिराती आणि वर्तमानपत्रात फुल्ल पेज ॲडस् देऊन नवीन घर घेणारे आणि अशा घरांमध्ये गुंतवणूक करणारे या दोन महत्वाच्या ग्राहकांना टार्गेट करणे सध्या सुरु आहे. मेट्रो सिटी सोडून छोट्या शहरांमध्येही चकाचक अशा जाहिराती दिसायला लागल्या आहेत. अशाच हायपर–लोकल प्रकारातल्या जाहिरातींनी सध्या मार्केट भरले आहे.

स्मार्टफोन्सपासून ते गृहोपयोगी वस्तूंपर्यंतचे इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडस्सुद्धा या उत्सवाच्या काळातल्या शर्यतीत आपली धाव टिकवून आहेत. मग ते ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म, स्थानिक स्टोअर्स किंवा ऑनलाईन जाहिरातींद्वारे असो या सेक्टरमधल्या छोट्यातल्या छोट्या ब्रॅण्डस्पासून जायंट अशा मोठ्या ब्रँडसपर्यंत सर्वच जण ग्राहकांना एक्सचेंज ऑफर, नो कॉस्ट इएमआय अशा गोष्टींनी भुरळ घालत आहेत.

आजकाल टीव्ही चॅनेल्सवर तर धुमशान सुरु आहे. टेलिव्हिजन जाहिराती या सर्वच प्रकारात प्रबळ भूमिका निभावतात. विशेषत: व्यापक प्रमाणात त्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात. जाहिरातींमध्ये झालेली ही लक्षणीय वाढ सणासुदीचा मूड दर्शवते. कोरोनानन्तर बाजारपेठ फुलून येण्यासाठी जाहिरातींनी मोठं योगदान दिलेले आहे. दिवाळी अगदी जवळ आली असताना, ग्राहकांची मने–आणि त्यांचे खिसे जिंकण्याची लढाई इथून पुढे आणखी तीव्र होणार आहे.

**– शंतनू खानवेलकर**
**९८९०२५२७७१**




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी. वैवाहिक जीवनात सौख्य लाभेल. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **वृषभ** : अकारण भीतीनं मन चिंतीत राहील. महत्त्वाच्या कार्यात अडचणी येतील. जुनी दुखणी उद्भवतील.
- **मिथुन** : व्यवसायात प्रतिष्ठा वाढेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. देश–विदेशात पर्यटनाचे बेत ठरतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत जोखीम पत्करू नका. हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. बाकी चिंता नको.
- **सिंह** : व्यवसायात प्रतिष्ठा वाढेल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात यश मिळेल.
- **कन्या** : परिचितांकडून भेटवस्तू प्राप्त होईल. सामजिक क्षेत्रात प्रतिष्ठा वाढेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **तूळ** : गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होईल. कायदेशीर प्रकरणाबाबत काळजी घ्यावी. प्रवास घडेल.
- **वृश्चिक** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक ताणातून मार्ग निघेल. प्रयत्नात सातत्य राखायला हवं.
- **धनु** : भावंडांचं सहकार्य लाभेल. येणी वसूल होतील. स्वकर्तृत्त्वातून अपेक्षित साध्य करू शकाल.
- **मकर** : सरकारी कामांना अनुकूलता राहील. प्रवास शक्यतो लांबणीवर टाकावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **कुंभ** : कामाचा उत्साह वाढता राहील. नोकरीत नव्या संधी लाभतील. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा.
- **मीन** : मनाप्रमाणे सारं घडत जाईल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. प्रियजनांचा सहवास लाभेल.

## दिनविशेष

### २० ऑक्टोबर

- **१९२०:** वकील आणि राजकारणी सिद्धार्थ शंकर रे यांचा जन्म.
- **१९६३ :** क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिद्धूचा जन्म.
- **१९७८ :** भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागचा जन्म.
- **२०११ :** लिबीयाचे हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचं निधन.
- **२०१३ :** अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या नियोजित भेटीपूर्वी शरीफ यांनी काश्मीरचा मुद्दा पुन्हा उकरुन काढला आणि या प्रश्नी अमेरिकेनं हस्तक्षेप करावा अशी आग्रही मागणी केली.

## आरोग्यमंत्र

### मलेरियाचा प्रादूर्भाव टाळा

मलेरिया हा डासांच्या चाव्यामुळे उद्भवणारा आजार असून साचलेल्या पाण्यात या आजारास कारक ठरणाऱ्या डासांची पैदास होते. म्हणूनच मलेरिया टाळण्यासाठी आधी डासांपासून बचाव करणं गरजेचं ठरतं. मलेरियाची कारणं, लक्षणं आणि प्रतिबंधात्मक उपायांविषयीही आपण जाणून घ्यायला हवं.



ॲनोफिलिस नावाच्या डासाच्या मादीमुळे मलेरियाचा फैलाव होतो. मलेरियाच्या प्रादुर्भावाला कारणीभूत ठरणारा हा एकमेव डास आहे. थंडी वाजून येणारा ताप, डोकेदुखी, घाम, थकवा, मळमळ, उलट्या ही मलेरियाची सर्वसाधारण लक्षणं मानली जातात. यासोबत कोरडा खोकला, अंगदुखी, सांधेदुखी हीदेखील या विकाराची महत्त्वाची लक्षणं आहेत. रक्ततपासणीद्वारे मलेरियाचं निदान केलं जातं. मलेरियाच्या तीव्रतेनुसार उपचारांची दिशा ठरवली जाते. मलेरियावर कोणतेही औषधोपचार १०० टक्के प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय करणंच जरूरीचं आहे. मलेरियाचा प्रादूर्भाव असणाऱ्या ठिकाणी जातानाही विशेष काळजी घ्यायला हवी. डासांची पैदास होणार नाही यासाठी विशेष उपाययोजना करायला हवी. त्यासाठी पावसाळ्यात बाहेर पडताना अंगभर कपडे घालावे. डासप्रतिबंधक मलमांचा वापर करायला हवा. मलेरियासदृश लक्षणं दिसली तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. घरच्या घरी उपचार करणं घातक ठरु शकतं.

## महत्त्वपूर्ण काही...

### निसर्गानेच सोय केली?

गरम पाण्याचे झरे हा सर्वांच्याच औत्सुक्याचा भाग असतो. अंग भाजेल अथवा अन्न शिजून निघेल इतकं गरम पाणी या झऱ्यांमध्ये असू शकतं. खेरीज औषधी गुणधर्मांनी युक्त असल्यामुळे अशा झऱ्यांमध्ये आंघोळ करण्यासाठी लांबून लांबून लोक येत असतात. हे झरे ज्वालामुखीच्या उगमाशी संबंधित असावेत असा संशय घ्यायला जागा आहे. पृथ्वीचा गाभा अत्यंत गरम आहे. मध्यावरणही अतितप्त आहे. पण बऱ्याच ठिकाणी बाह्यावरणाचा काही भाग भरपूर गरम असल्याचंही लक्षात आलं आहे. आईसलँड, न्यूझीलंड इथल्या काही भागांमध्ये जेमतेम एक ते तीन किलोमीटर खोलवर बोअरिंग घेतलं असता भूगर्भातील गरम पाणी आणि वाफ मिळवता येते असा अनुभव आहे. एवढ्या खोल छिद्र पाडणं महागडं असलं तरी यातून मिळणारी ऊर्जा अनेक वर्षे पुरणार असल्यामुळे हा खर्च परवडतो. हे गरम पाणी वा वाफ वापरून घरं उष्ण ठेवण्याचा वा विद्युतनिर्मिती उद्योग करण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात आइसलँड व न्यूझीलंडसारख्या थंड प्रदेशात निसर्गानेच ही सोय केलीये?

## सल्ला मोलाचा

### फेशियलमुळे मिळवा ग्लोइंग लूक

दिवाळी म्हटलं की तरुणींच्या तयारीला उधाण येतं. सगळ्यांमध्ये व्यस्त असताना एक गोष्ट विसरून चालत नाही. ती म्हणजे पार्लर आणि फेशियल. प्रदुषणामुळे टॅन झालेल्या त्वचेला वेगवेगळ्या प्रकारचे फेशियल्स नवसंजीवनी देतात. ✻ फ्रुट फेशियल– फेशियलचा बेसिक प्रकार म्हणून या फेशियलकडे पाहिलं जातं. साईड इफेक्ट नसल्याने फेशियलचा हा प्रकार तरुणींमध्ये लोकप्रिय आहे. ✻ इलेक्ट्रिक शॉक फेशियल– हे फेशियल थोडी भीती वाटायला लावणारं आहे. मायक्रो करंटची निर्मिती करून हे फेशियल केलं जातं. मध्यमवयीन स्त्रियांसाठी हे फेशियल अत्यंत उपयुक्त आहे. ✻ पॅराफिन फेशियल– सेलिब्रिटींमध्ये लोकप्रिय असलेलं फेशियल म्हणून या फेशियलकडे पाहिलं जातं. हे फेशियल युवतींसाठी फायदेशीर ठरतं. ✻ गॅल्व्होनिक फेशियल– रुक्ष आणि निर्जिव त्वचेसाठी गॅल्व्होनिक फेशियल वरदान ठरू शकतं. त्वचा पुन्हा ताजी टवटवीत करण्याचं काम या फेशियलद्वारे केलं जातं. ✻ ऑईल फ्री फेशियल– तेलकट आणि डागविरहीत त्वचेसाठी ऑईल फ्री फेशियल वरदान थरू शकतं.

## पंचांग

**रविवार, २० ऑक्टोबर २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
अश्विन कृ. ३/४, नक्षत्र : कृत्तिका
चंद्रराशी : वृषभ, व्यतिपात योग
सूर्योदय : ६.३६, सूर्यास्त : ०६.१०

## फॉरवर्डस

**काळानुरुप नाती बदलतात, नात्याची निगडित भावना बदलतात**

ज्यादा कुछ नहीं बदला, उनके और मेरे बीच में

पहले नफरत नहीं थी, अब मोहब्बत नहीं हैं


## वाचा तर खरं

विषाबद्दल माहिती घेताना बरीच रंजक तथ्य समोर येतात. जसं की, प्राण्यांच्या शरीरातील विष हे एक प्रकारचं प्रोटीन असतं. नखं, दात, सुळे आदी भागातून हे विष सोडलं जातं. सलॅमॅंडरची एक प्रजाती बरगड्यांमधून विष सोडू शकते. काही प्रकारच्या विषाने भक्ष्य विकलांग होतं. उदाहरणार्थ ब्लडवर्म एखाद्या जलचर प्राण्यावर हल्ला करतो तेव्हा त्या प्राण्याला स्पॅस्टिक प्रकारचा पक्षाघात होतो. पण हा परिणाम तात्पुरता असतो असंही संशोधकांना आढळून आलं आहे.

## करिअरवाटा

### मॅनेज करा डेडलाईन

ऑफिसमध्ये कामांची डेडलाईन मॅनेज करणं हे एक कौशल्याचं काम आहे. ते साधण्यासाठी सर्वप्रथम कामाचं स्वरूप लक्षात घ्या. बॉसनं आपल्यावर सोपवलेल्या कामाला नेमका किती वेळ लागेल याचा अंदाज घ्या. त्यानंतर दिलेल्या डेडलाईनमध्ये ते पूर्ण करता येईल का? हे तपासा. अधिक वेळ लागणार असेल तर तात्काळ जास्तीचा वेळ मागून घ्या. यामुळे बॉसलाही तुमची अडचण समजेल आणि वेळ वाढवून मिळेल. मात्र वाढीव मुदत मिळाल्यानंतर त्या वेळेत काम पूर्ण करणं गरजेचं आहे. बरेचदा डेडलाईनबाबत बॉस आग्रही असतो. अशा वेळी कामामध्ये काही त्रुटी राहू शकतात याची वेळीच कल्पना द्या. त्यानंतरही डेडलाईनबाबत आग्रही राहिल्यास चुकीच्या कामाची जबाबदारी तुमच्यावर राहणार नाही. डेडलाईन पूर्ण करण्यासाठी कामाचा प्राधान्यक्रम बदला. एखादं काम सहकाऱ्यांकडे सुपुर्द करून, कामासाठी एखाद्या सहकाऱ्याची मदत घेऊन डेडलाईन पाळण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी अन्य मार्गाचा अवलंब होऊ शकतो का याचाही विचार करा. कुठल्याही परिस्थितीत निर्देशित वेळेत काम पूर्ण होणं शक्य नसेल तर वरिष्ठांना दुसरे पर्याय सुचवा.




## खेचाखेची

### सरप्राईज...

पत्नीने नवऱ्याला न सांगता नवीन सीम कार्ड घेतलं. त्याला सरप्राईज देण्यासाठी ती किचनमध्ये जाऊन फोन करते.

.

**बायको:** हॅलो डार्लिंग, कसा आहेस?

.

**नवरा:** अगं मी घरी आहे, नंतर बोलतो. आमचं येडं किचनमध्ये आहे.

.

नवरा सध्या हॉस्पिटलमध्ये आहे.

## वेगळे काही

बंगालमध्ये जलपरी अस्तित्वात आहे. पटूरानी नावाची महिला गेली वीस वर्षं पाण्यात राहते. गेली वीस वर्षं ती दररोज बारा तास पाण्याखाली राहते. तिचा हा दिनक्रम कडाक्याच्या थंडीतही सुरु असतो हे विशेष! सुर्योदय झाल्यावर पटूरानी घरामागे असलेल्या तलावात जाते. पूर्ण दिवस ती तलावाच्या पाण्यात डुंबत राहते. सुर्यास्तानंतर ती तलावाच्या बाहेर पडते. पटूरानी जलवास्तव्याचं कारण सांगते की, वीस वर्षांपुर्वी त्वचेच्या एका रोगाने ग्रासल्यानंतर तिची त्वचा उन्हामध्ये जळू लागायची. यावर उपाय म्हणून तलावाच्या पाण्यात तासनतास डुंबत राहणं तिला आवडू लागलं. रोजचे बारा ते चौदा तास पाण्याखाली काढणारी पटुरानी कोणत्याही आश्चर्यापेक्षा कमी नाही.

## फॅशन पॅशन

### मिळवा गोल्डन लूक

सणावारी विशेष प्रावरणं परिधान करण्याचा मोह आवरत नाही. या काळात तसंच आगामी लग्नसराईच्या निमित्ताने काही हटके खरेदी हवी असेल तर गोल्ड ही थीम ठरवता येईल. करीना कपूर–खान, दीपिका पदुकोण, राधिका आपटे, सोनम कपूर, ऐश्वर्या राय–बच्चन या अभिनेत्रींकडून सोनेरी रंग असा कॅरी करायचा हे शिकता येईल. या काही टिप्स खास तुमच्यासाठी...



✻ खास समारंभासाठी सिल्की वाईड लेग लामे झगमगीत पँट घालून सिंपल टॉप घालता येईल. ✻ समारंभात एकदम हटके दिसायचं तर गोल्डन जंपर अँड सारी ड्रेस कॅरी करता येईल. एथनिक आणि वेस्टर्नचं हे फ्युजन मस्त दिसेल. यासोबत स्टेटमेंट मेटॅलिक ज्वेलरी घाला आणि सगळ्यांमध्ये उठून दिसा. ✻ तुम्ही झळाळती सोनेरी साडीही नेसू शकता. यजमान असाल तर हा लूक कॅरी करता येईल. गोल्डन साडी आणि गोल्डन ब्लाउज हे कॉम्बिनेशन हिट ठरेल. ✻ तुम्ही स्ट्राईप्सवाली गोल्डन साडी नेसू शकता. त्यासोबत गोल्डन ॲक्सेसरीज घाला. ✻ गोल्डन लेहंगा, चोली सोबत गोल्डन दुपट्टा असा ऑल गोल्डन लूक कॅरी करा.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ‘‘समाचार’’ ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा–अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

शनिवार, दि. १९ ऑक्टोबर २०२४ पान ३


## पान १ वरुन

### शहरातील समस्या ठरणार निवडणुकीत कळीचा मुद्दा

अवस्था अतिशय बिकट झाली आहे. खड्डयातून वाट काढताना कसरत करावी लागत आहे. शहरातील नवीन विकसीत होत असलेल्या वसहतींमध्ये अजूनही माती आणि मुरूमाचे रस्ते आहेत. दरम्यान, कचरा, मोकाट जनावरे आणि श्वान यांचा प्रश्न गंभीर आहे. हे सर्व प्रश्न महापालिकेच्या अखत्यारीत येत आहे. मात्र, महापालिका प्रशासनाकडून हे प्रश्न मार्गी लावण्यात आलेले नाहीत.

### भाजपा १५५, शिवसेना ७८ तर राष्ट्रवादीला ६० जागा!

त्यानुसार महायुतीत भाजपाच मोठा भाऊ ठरला आहे. भाजपा विधानसभेच्या १५५ पेक्षा अधिक जागा लढविणार असून भाजपा त्यांच्या छोट्या मित्रपक्षांना स्वतःच्या कोट्यातून जागा देणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ७० ते ७८ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्वादीला ५५ ते ६० जागा मिळणार असल्याचे सांगण्यात आले. महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला येत्या दोन दिवसात जाहीर होण्याची शक्यता आहे.

### फौजदारी आणि बडतर्फीच्या कारवाईचा इशारा

घेऊ शकणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.अधिकारी किंवा कर्मचारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागी असल्यास त्याला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ नुसार कोणतीही नोटीस न देता फौजदारी स्वरूपाची व मनपा सेवेतून बडतर्फीची कारवाई केली जाईल, असे आयुक्त डांगे यांनी आदेशात म्हटले आहे.

## विक्रीचा जोर!



ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्या विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) भारतीय शेअरबाजारात विक्रमी विक्री करून ६६,३०० करोड रुपये काढले आहेत. यातील मुख्य विक्रीचा जोर हा वित्तीय समभाग म्हणजेच बँकांच्या शेअर्समधून (२३ हजार २७४ करोड रुपये) काढले आहेत. ऑइल अँड गॅस क्षेत्रातील रिलायन्स तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रातील विक्रीचा जोरही मोठा आहे. विदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीचे मुख्य कारण भूराजकीय तणाव हे असले तरी यानिमित्ताने भारतीय शेअरबाजारातील वाढलेले मूल्यांकन आणि त्यांच्या तुलनेने स्वस्त असणारी चीनची उपलब्ध बाजारपेठ हेच आहे. भारतात विक्री करून त्यातील




नफा काही प्रमाणात चीनमधील समभागात गुंतवणुकीचा कल सध्या तरी दिसून येत आहे. तथापि बाजार तज्ज्ञांच्या मते ही परिस्थिती तात्पुरती आहे. मजबूत फंडामेंटल्स व भविष्यात भारतीय कॉर्पोरेटचे वाढणारे अर्निंग याच एफीआयला दुप्पट वेगाने भारतात खेचून आणण्याची शक्यता जास्त आहे.

अनेक ब्रोकरेज कंपन्यांनी सकारात्मक बाय रेटिंग दिलेला ह्युंदाई या चारचाकी कंपनीच्या आयपीओला किरकोळ गुंतवणूकदारांनी फारसा प्रतिसाद दाखविला नाही. मुळात जागतिक अस्थिरता व त्याच्या पार्श्वभूमीवर आणि शेअरची इशू प्राईज १९६० रुपये प्रति शेअर असल्याने गुंतवणूकदार सकारात्मक नव्हते. संस्थात्मक गुंतवणूकदारांचा प्रतिसाद चांगला राहिला. भारतीय शेअर बाजारात कंपनीच्या व्हॅल्यूपेक्षा शेअर्सच्या बाजारातील किमतीलाच अजून जास्त महत्व दिले जाते. ज्या शेअर्सची किंमत कमी उदाहरणार्थ १०० किंवा १५० रुपये अशा शेअर्सला गुंतवणूकदारांचा मागेपुढे न पाहता मोठा प्रतिसाद मिळत असतो. हुंडाईच्या लिस्टिंगनंतर सुद्धा सध्याची अस्थिर परिस्थिती पाहता खरेदीची घाई न केलेलीच बरी.

भारतातील सर्वात मोठी सौर मॉडेल निर्माता वारे एनर्जीज लिमिटेड आपली प्रारंभिक सार्वजनिक ऑफर लॉन्च करणार आहे. कंपनीचा प्राईस बँड १४२७ रुपये आणि १५०३ रुपये दरम्यान निश्चित केला आहे. वारे एनर्जी १९९० मध्ये स्थापन झालेल्या मुंबईत मुख्यालय असलेल्या वारे रिन्यूएबल टेक्नॉलॉजी या कंपनीची मूळ कंपनी आहे. बारा गिगावॅटची निर्मितीस्थापित क्षमता असणारी भारतातील सर्वात मोठी सौर मॉडुल निर्मिती कंपनी आहे. आर्थिक वर्ष २०२४ पर्यंत सौर ऊर्जा बाजारपेठेतील भारतातील २०% हिस्सा यांच्याकडे आहे. कंपनीची सोलर पी व्ही मॉडेल्सचे प्रलंबित ऑर्डर बुक १६.६६ गिगावॅट एवढी आहे. कंपनीचा निव्वळ नफा मागील वर्षी ४४% सीएजीआर एवढा नोंदवला गेला आहे. सौरऊर्जेतील उज्वल भविष्य आणि त्यातील प्रमुख खेळाडू असे असले तरी कंपनी प्रामुख्याने युएस मधील निर्यातीवर अवलंबून आहे. कंपनीचा ९०% कच्चामाल चीनमधून आयात केला जातो. भविष्यात या मालावर निर्बंध किंवा आयात शुल्क कंपनीच्या नफ्यावर परिणाम करू शकतात. या सर्व बाबी समजावून घेऊन आपली जोखीमक्षमता लक्षात घेऊन गुंतवणूकदारांनी या आयपीओकडे पहावे.

**- राजेश देशपांडे**
**देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर**
**M.9850724890**

### दि. २७ ऑक्टोबर रोजी पहिले प्रशिक्षण

# अधिकारी- कर्मचाऱ्यांची मतदारसंघ क्षेत्रनिहाय सरमिसळ

**समाचार/नगर-दि.१९**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नगर जिल्ह्यातील १२ मतदारसंघात नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांची विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय सरमिसळ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली. यासरमिसळ प्रक्रियेवेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, मनुष्यबळ व्यवस्थापन समन्वयक अतुल चोरमारे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी गजानन नकासकर उपस्थित होते. नगर जिल्ह्यांतर्गत १२ विधानसभा क्षेत्रासाठी ४ हजार ९३२ मतदान केंद्राध्यक्ष, ४ हजार ७६१ प्रथम मतदान अधिकारी तसेच ४ हजार ९०१ पुरुष व ६ हजार २१५ महिला अशा इतर मतदान अधिकाऱ्यांची सरमिसळ संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात आली. सर्व नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना २७ ऑक्टोबर रोजी त्यांच्या विधानसभा मतदारसंघांमध्ये पहिले प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



**२४ हजार ९६९ जाहिराती काढल्या**

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासूनच्या ४८ तासामध्ये जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, घोषणा फलक, रंगविलेल्या जाहिराती, कोनशिला, झेंडे काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसरातील ११ हजार ६४१, सार्वजनिक ठिकाणच्या ९ हजार ५०२ तर खाजगी मालमत्तेवरील ३ हजार ८२६ अशा एकूण २४ हजार ९६९ जाहिराती काढण्यात आल्या असल्याची माहिती आचारसंहिता कक्षातर्फे देण्यात आली आहे. अकोले मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८६४, सार्वजनिक ठिकाण ३९१ तर खाजगी मालमत्तेवरील ३२० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या. संगमनेरमध्ये कार्यालय परिसर ८१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ८८, खाजगी मालमत्तेवरील २५५, शिर्डी मतदारसंघात कार्यालय परिसर ९१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ६४१, खाजगी मालमत्तेवरील ३५१, कोपरगावात कार्यालय परिसर ९५४, सार्वजनिक ठिकाण ६१९, खाजगी मालमत्तेवरील ३०९, श्रीरामपूरमध्ये कार्यालय परिसर १ हजार १३१, सार्वजनिक ठिकाण १ हजार ५५० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.नेवाशात कार्यालय परिसर ३२४, सार्वजनिक ठिकाण ५७७, शेवगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ८५४, सार्वजनिक ठिकाण ९३७, खाजगी मालमत्तेवरील १ हजार ७२३, राहुरीमध्ये कार्यालय परिसर २५४, सार्वजनिक ठिकाण १४१, खाजगी मालमत्तेवरील २१, पारनेर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १२३, सार्वजनिक ठिकाण ९७८, खाजगी मालमत्तेवरील ४९५ जाहिराती काढण्यात आल्या. नगर शहरात कार्यालय परिसर २८६, सार्वजनिक ठिकाण ४१६, खाजगी मालमत्तेवरील ४१, श्रीगोंदामध्ये कार्यालय परिसर १ हजार २९४, सार्वजनिक ठिकाण ८०२, खाजगी मालमत्तेवरील ३११ तर कर्जत- जामखेडमध्ये कार्यालय परिसर १ हजार ८२५, सार्वजनिक ठिकाणच्या ३६२ जाहिराती काढण्यात आल्या.

### दोनजणांवर गुन्हा दाखल; २१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

# राहुरीच्या हॉटेलमधील वेश्या व्यवसायावर एलसीबीचा छापा

**समाचार/नगर-दि.१९**

राहुरीमधील न्यू भरत हॉटेल येथील वेश्याव्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखा आणि राहुरी पोलिसांनी संयुक्त कारवाई करून छापा टाकला. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोसई तुषार धाकराव, पोलीस अंमलदार संदीप दरंदले, संतोष खैरे, विशाल तनपुरे, रणजीत जाधव, सारीका दरेकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पोसई तुषार धाकराव यांना माहिती मिळाली की, न्यू भरत हॉटेल येथे एक इसम महिलाकडून कुंटणखाना चालवित आहे. त्यानुसार सदरची माहिती राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तसेच पोनि संजय ठेंगे, पोलीस अंमलदार एकनाथ आव्हाड, विकास साळवे, जालिंदर साखरे यांच्या पथकाने संयुक्तरित्या कारवाई केली. पथकातील पोलीस अंमलदारास बनावट ग्राहक म्हणून पाठविले. पथकास सदर हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय चालू



असल्याबाबत खात्री पटल्यानंतर पंचासमक्ष हॉटेलवर छापा टाकुन हॉटेलमधील विक्रम सुरेश विशनानी (वय २७, रा. तनपुरेवाडी, ता.राहुरी) यास ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली. त्याच्या ताब्यातून २० हजार रूपये किंमतीचा एक मोबाईल व १ हजार रूपये रोख रक्कम असा एकुण २१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. विक्रम सुरेश विशनानी याच्यासह हॉटेलची पाहणी केली असता, हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरील रूममध्ये ३ महिला मिळून आल्या. त्यांच्याकडे विचारपूस केली असता, वेश्याव्यवसाय करून ग्राहकाकडून पैस घेऊन, त्यामधून आम्हास पैसे देतात व आमच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतात, अशी त्यांनी माहिती दिली. पोलिसांनी या पीडित महिलांची सुटका केली. या कारवाईत विक्रम सुरेश विशनानी ( वय २७, रा.तनपुरेवाडी, ता.राहुरी), फराद अहमद सय्यद (वय ३८, रा.राहुरी) हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता ३ महिलांकडून कुंटणखाना चालवून त्यावर आपली उपजिवीका करताना मिळून आले.

### दीपोत्सवात लोकशाहीच्या उत्सवाबाबत जनजागृती

# शाळा-महाविद्यालयातून होणार लोकशाहीचा जागर

**समाचार/नगर-दि.१९**

विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी जनजागृती उपक्रमात सहभागी होणार असून नागरिकांनाही या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नगर जिल्हा स्वीप समिती आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून लोकशाहीचा दीपोत्सव या उपक्रमाचे २१ ते २६ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थी आगळ्यावेगळ्या पद्धतीने मतदार जागृती करणार आहेत. आमचा आकाश कंदील-आमची विधानसभा या संकल्पनेवर आधारीत स्पर्धेचे यानिमित्ताने आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आई-बाबा तुम्ही लोकशाहीची पणती हाती धरा,विधानसभेच्या निवडणुकीत जरूर मतदान करा, आपले मतदान २० नोव्हेंबर रोजी आहे. कृपया विसरू नका, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो असे संदेश यंदाच्या दिवाळीत विद्यार्थ्यांनी बनविलेल्या आकाश कंदीलांवर दिसतील. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासोबत त्यांना लोकशाही प्रक्रीयेचा एक घटक म्हणून काम करण्याचा आनंदही या उपक्रमातून मिळणार आहे. हॅप्पी दिवाळी - हॅप्पी लोकशाही या भेटकार्ड स्पर्धेअंतर्गत पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून तयार करण्यात आलेले भेटकार्ड आणि शुभेच्छा पत्रे घरोघरी पाठविण्यात येणार आहेत. अंगणात सजणारी विविधरंगी रांगोळी आता लोकशाहीच्या रंगातही रंगलेली दिसेल. रंग लोकशाहीचे या रांगोळी स्पर्धेत विद्यार्थी घराचे अंगण, शाळा किंवा सार्वजनिक ठिकाणी रांगोळी काढून मतदानाचे महत्व सांगणार आहेत.विद्यार्थ्यांच्या हातावर रंगणाऱ्या मेहंदीद्वारे देखील मतदान, निवडणूक, लोकशाही, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, बोटावरील मतदानाची शाई आदी संकल्पना मांडण्यात येणार आहेत. चारही स्पर्धांसाठी पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी, अकरावी व बारावी, वरिष्ठ महाविद्यालय आणि खुला गट, असे पाच गट असून आकाशकंदील ,भेटकार्ड, शुभेच्छा पत्रे ,रांगोळी व मेहंदी या चारही स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या कलाकृतीचे एक छायाचित्र व कलाकृतीबरोबर सेल्फी असे दोन छायाचित्र ५ नोव्हेंबरपर्यंत पाठवायचे आहेत.

# भानुदास मुरकुटे यांच्या जामीन अर्जावर मंगळवारी सुनावणी

**समाचार/नगर-दि.१९**

श्रीरामपूरचे माजी आमदार भानुदास मुरकुटे यांना अत्याचाराच्या गुन्ह्यात राहुरी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांनी जामिनासाठी येथील जिल्हा आणि सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. दरम्यान, या अर्जावर काल, शुक्रवारी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतू, फिर्यादी पक्षाने म्हणणे मांडण्यासाठी आणखी मुदत मागितली आहे. यावर आता मंगळवारी (२२ ऑक्टोबर) सुनावणी होणार आहे, अशी माहिती मुरकुटे यांचे वकिल अ‍ॅड. सुरेश लगड यांनी दिली. पीडित महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून भानुदास मुरकुटे यांच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, गुन्हा दाखल होताच राहुरी पोलिसांनी मुरकुटे यांना त्यांच्या श्रीरामपूर येथील निवासस्थानावरून ताब्यात घेत अटक केली आहे. दरम्यान, त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर सरकारी पक्षाने लेखी म्हणणे सादर केले आहे. काल, शुक्रवारी सुनावणी झाली. यावेळी फिर्यादीच्या वकिलांनी जामीन अर्जावर म्हणणे सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली. त्यांनी १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी देखील म्हणणे मांडण्यास मुदतवाढ मागितली होती. दरम्यान, न्यायालयाने फिर्यादी पक्षाला म्हणणे सादर करण्यास मुदतवाढ देत पुढील सुनावणी २२ ऑक्टोबर रोजी ठेवली आहे.

### प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळास आश्वासन

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणार-गोसावी

**समाचार/नगर-दि.१९**

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांची अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने शिक्षण संचालनालय, पुणे येथे भेट घेतली. त्यावेळी राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने शिक्षण संचालनालयाकडून सोडवण्यात येणार असल्याबाबत स्पष्ट आश्वासन दिल्याची माहिती अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्यसरचिटणीस कल्याण लवांडे व राज्य संयुक्तचिटणीस राजेंद्र निमसे यांनी दिली .



या प्रलंबित प्रश्नांमध्ये प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांचे वेतन दीपावली पूर्वी अदा करावे , दीपावली अग्रीम दीपावलीपूर्वी मिळावा,राज्यातील विविध जिल्ह्या-जिल्ह्यातील शालेय कामाच्या दिवसांमधील विषमता दूर करणे कामी संघटनेकडून शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेल्या छत्तीस जिल्ह्यांच्या सुट्टयांच्या अभिप्रायानुसार शासनास वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणे, तालुकास्तरीय समायोजन होते वेळी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नसल्यामुळे झालेल्या समायोजन बदलीमध्ये संबंधित शाळेच्या विद्यार्थी उपस्थिती तपासणीनंतर पुनश्च संबंधित शाळेत संबंधित शिक्षकाची समायोजन बदली होणे केंद्रप्रमुखांच्या पदोन्नती करणे तसेच इतर विषयांबाबत सांगोपांग चर्चा झाली. प्राथमिक शिक्षण संचालक गोसावी यांनी खुमासदारपणे सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन लवकरच सर्व प्रश्नांचा निपटारा करण्याचे आश्वासन दिल्यामुळे संघटना प्रतिनिधी यांचे समाधान केले .

यावेळी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे, राज्य संयुक्तचिटणीस राजेंद्र निमसे, राज्य मध्यवर्ती शिक्षक समन्वय समितीचे राज्याध्यक्ष केशव जाधव ,संघाचे नगर जिल्हाध्यक्ष बबन गाडेकर, इब्टाचे राज्याध्यक्ष उत्तरेश्वर मोहोळकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

साहित्य मैफल

# कसा रंगेल निवडणुकीचा आखाडा?

विश्लेषण

अनिकेत जोशी
ज्येष्ठ पत्रकार


राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. गेल्या पाच वर्षांचा राजकीय काळ अनेक धक्कादायक, अनपेक्षित घटनांनी हादरवून टाकणारा होता. या काळात राज्यात नवी राजकीय समिकरणे बघायला मिळाली. या काळात राज्याने घातकी राजकीय डावही बघितले. आता आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही मोठ्या युतींच्या खेळी बघणे रंजक ठरणारे आहे.

महाराष्ट्रात पंधराव्या विधानसभेसाठी निवडणूक जाहीर झाली. २३ नोव्हेंबर या ऐतिहासिक तारखेला त्याचा निकाल जाहीर होणार आहे. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी फडणवीस आणि अजित पवार यांच्या सरकारचा शपथविधी झाला होता आणि त्याच दिवसापासून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घटनांची मालिका सुरू झाली होती, जी आजपावेतो सुरूच आहे. त्याआधी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट होती. त्या पहाटे ती उठवली गेली आणि शपथविधी पार पडला. खरे तर या घटनेनेच धक्कातंत्राचा नमुना सेट केला होता आणि ही संपूर्ण विधानसभा तशाच प्रकारे अतिशय खळबळजनक घटनांनी गाजत राहिली. भाजपबरोबर युती करुन निवडणूक लढवणारी शिवसेना निकालानंतर ताबडतोब शरद पवार आणि काँग्रेसबरोबर गेली आणि महाविकास आघाडी स्थापन झाली. त्यावेळी शिवसेनेचे ५६ आमदार होते तर शरद पवारांचे ५४ होते. दोन आमदार जास्त असल्याच्या बळावर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपद मिळाले. राज्यातील मोठा, अधिक मतदार असणारा पक्ष असूनही काँग्रेसला केवळ ४४ जागा मिळाल्या. भाजपाकडे १०५ आमदार होते. मात्र सगळ्यात मोठा पक्ष असूनही तो विरोधात बसला, हीदेखील क्वचितच बघायला मिळणारी बाब त्यावेळी दिसून आली. पुढे कोरोनामुळे हे सरकार नीट चालू शकले नाही. जवळपास दीड वर्ष त्यातच गेले. त्या काळी विधानसभेचे कोणतेही अधिवेशन आठवड्यापेक्षा अधिक काळ चालले नाही. स्वाभाविकच राजकारणात एक खदखद जाणवत होती. त्यामुळेच कोरोनानंतरच्या काळात झालेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात म्हणजे मार्च २०२२ मध्ये सरकार गडगडण्यास सुरूवात झालेली दिसली.

या टप्प्यावर सर्वप्रथम अनिल देशमुख यांचे प्रकरण निघाले. उद्धव ठाकरेंचा कार्यकर्ता असणारा एक पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराखाली कथित बॉंब ठेवण्याचे धाडस केल्याची घटना गाजली. तिने धक्कादायक वा भूकंप घडवून आणणाऱ्या घटनांच्या मालिकेत भर घातली. पुढे गाडीचा मालक मृतावस्थेत आढळला आणि प्रकरण चिघळले. हा खटला अद्यापही सुरू झालेला नाही. दीड-दोन वर्षांनंतर अनिल देशमुख तुरुंगाबाहेर आले. दरम्यान, नबाब मलिक अडचणीत आल्याचे आपण पाहिले. त्यापाठोपाठ संजय राठोड अडचणीत आले. थोडक्यात, उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील बरेच मंत्री अडचणीत येत होते आणि भाजपाला मोठा फायदा मिळत होता. सरकारकडे नसणारी माहिती आधी फडवणीसांकडे येत होती. त्यामुळे सरकार अस्थिर अवस्थेत होते. नंतरच्या राज्यसभेच्या निवडणुकीतही शिवसेनेला मोठा फटका बसला आणि पुढील दहाच दिवसात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर सरकार कोसळले. त्यानंतर जूनच्या अखेरीस एकनाथ शिंदेंचे सरकार आले पण ते वैध की अवैध यावर प्रश्नचिन्ह होते. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात जाऊनही कोणताही निकाल लागलेला नाही. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि पक्षाचा मोठा घटक अजित पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर येऊन महायुती सरकारमध्ये सामील झाला. भाजपाच्या मतदारांना हे पटले नव्हते, रुचले नव्हते; पण सरकार काम करत राहिले.

जून २०२२ नंतरच्या कालखंडात महायुती सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतले. थांबलेली प्रकरणे, अडलेले प्रकल्प मार्गी लागले. असे असले तरी या सरकारला शेतकरीवर्गाची नाराजी दूर करता आली नाही. मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आक्रमक झाला. मनोज जरांगेंच्या आंदोलनाने या प्रश्नाला मोठी गती आणि वेगळा आयाम दिला. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळू शकते, कुणबी असल्यामुळे त्यांना कुणबी दाखले द्या, ही मोठे सामाजिक अभिसरण घडवून आणणारी मागणी त्यांनी केली. या घुसळणीतून अमृत न निघता जातीयवादाचे विष मात्र निघाले. सरकारने हे आंदोलन शांत करण्याचे प्रयत्न केले आणि जरांगेंना मर्यादेपलीकडे जाऊन आश्वासने दिली. ती पूर्ण करणे शक्य नव्हते. पण लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न साध्य केला गेला. २०२४ च्या लोकसभा निकालामध्ये या सगळ्याचा मोठा फटका भाजपा आणि मित्रपक्षांना बसला. या सगळ्या स्फोटक पार्श्वभूमीवर येऊ घातलेली निवडणूकही अतिशय गुंतागुतीची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्राचे दोन मोठे पक्ष फुटले आहेत. आधी शिवसेनेची १६-१७ टक्के आणि राष्ट्रवादीचीही साधारणत: तेवढीच मतांची टक्केवारी होती. शरद पवारांनाही महाराष्ट्रात कधीही ६० पेक्षा जास्त जागा मिळाल्या नाहीत तर शिवसेनेला ७० जागांपुढे जाता आलेले नाही. म्हणजेच १०० पेक्षा जास्त जागा न मिळाल्याने कधीही स्वबळावर त्यांचे सरकार आलेले नाही.

दुसरीकडे भाजपाला दोन वेळा सरकार आणता आले. सलग दोन निवडणुकांमध्ये (२०१४ आणि २०१९) शंभरपेक्षा जास्त जागा मिळवून त्यांनी ही बाब साधली. ऐंशीच्या दशकात काँग्रेस करत असणाऱ्या विक्रमाशी त्यांना बरोबरी साधता आली. भाजपाची स्वत:ची मतेही फार कमी झालेली नाहीत. मात्र शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना या निवडणुकीत मोठा फटका बसणार आहे. लोकसभेला ठाकरे आणि शरद पवारांना एकमेकांची मदत झाली. दोघांकडील पेटून उठलेल्या कार्यकर्त्यांनी चांगला हात दिला. पण तशी मदत विधानसभेला मिळणार नाही, कारण ही लढत २८८ मतदारसंघांमध्ये होत आहे. त्यामुळेच ४८ मतदारसघांमध्ये एकत्र आलेली ताकद विखुरलेली दिसेल. विधानसभा निवडणुकांच्या परिप्रेक्ष्यातून लोकसभेच्या निकालाचे



विश्लेषण केले तर काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष दिसतो. त्यानंतर भाजपाची वर्णी आहे. पण शरद पवार आणि ठाकरेंची ती परिस्थिती नाही. त्यामुळेच शिवसेनेच्या दोन्ही गटांचा ५०-६० जागांवरच प्रभाव राहील, असे वाटते. थोडक्यात, हा ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना फटका आहे. त्याचप्रमाणे अजित पवार आणि शरद पवारांनाही फटका बसेल. हे दोन्ही गट एकमेकांची मते खाऊनच मागे पडण्याची चिन्हे आहेत. मतदारासंघामध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्यांनी तेथे लढायचे असे गणित वा मांडणी महायुतीमध्ये असल्यामुळे भाजपाला जास्त मतदारसंघ लढता येतील. सहाजिकच तेवढ्या जागा अन्य दोन पक्षांना मिळणार नाहीत.

मतांचे गणित तपासून बघायचे तर लोकसभेला दोन्ही मोठ्या आघाड्यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्याचा फरक आहे. महायुतीला तेवढीच मते वाढवावी लागतील. लाडकी बहीण योजनेचे सहा हप्ते दिल्यानंतर महिला मतदारांचा झुकता कल हा फरक भरुन काढू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसेही दिले गेले आहेत. त्याचबरोबर अडकलेल्या मोठ्या योजनाही महायुतीतर्फे मार्गी लावल्या गेल्या आहेत. पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, मुंबईत मेट्रोच्या ॲक्वा लाईनचा एक टप्पा, कोस्टल रोडचा एक भाग, अटल सेतू सुरु होणे, सामान्यजनांसाठी टोल हटवले जाणे हे याचे उदाहरण म्हणावे लागेल. अगदी आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी महायुतीने मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला. थोडक्यात, लोकांच्या हाती पैसे, सेवा पुरवून खुश करण्याचा प्रयत्न महाआघाडीने केला आहे. सात आमदारांची नेमणूक ही आणखी एक महत्त्वपूर्ण घटना म्हणावी लागेल. म्हणजेच मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी राज्यकर्त्यांना आवश्यक असणारी सगळी काळजी त्यांनी घेतली आहे. याचा प्रत्यक्ष फायदा कसा होतो आणि आवश्यक असणारी एक-दोन टक्का अधिक मते ते कसे खेचून आणू शकतात, हे लवकरच बघायला मिळेल.

लाडकी बहीण योजनेमध्ये एकेका विधानसभा मतदारसंघात एक लाखांपेक्षा अधिक महिला समाविष्ट केल्या गेल्या आहेत. त्यातील निम्म्या मतदार महिलांनी पूर्वीचे मतदान बदलून मते फिरवली तरीदेखील मोठा फरक पडेल आणि अडचणीत असणारे मतदारसंघ सूकर होतील असे काही विद्यमान तर काही विरोधी पक्षातील आमदार सांगत आहेत. अर्थात असे असले तरी महायुती सरकारच्या काही निर्णयांमुळे नाराज वर्गाची संख्याही मोठी आहे. मराठा आरक्षण, आदिवासी सवलती, धनगर-धनगड वाद, शेतकऱ्यांची नाराजी यासारख्या प्रश्नांचे खापर सरकारच्या माथी फुटू शकते. या सगळ्याची प्रचिती २३ नोव्हेंबरच्या निकालामधूनच येईल.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

# रात्र थोडी, सोंगे फार!

**निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात 'कही खुशी, कही गम' असे वातावरण होते. मात्र या चित्राची किनार दिवसागणिक बदलत नेली. जनतेच्या मनाचा थांग लावण्यासाठी राजकीय पक्षांची लगबग वाढू लागली. आता प्रत्यक्ष तारखा जाहीर झाल्यामुळे घोडामैदान जवळ आले असून आपले घोडे दामटवण्यात कोणताही पक्ष मागे राहणार नाही.**

दखल

जनार्दन पाटील

बहुप्रतिक्षित विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. असेही लोकसभा निवडणुकीनंतर 'कही खुशी, कही गम' असे वातावरण होते. मात्र लगोलग घडणाऱ्या घटनांनी या चित्राची किनार दिवसागणिक बदलत नेली. जनतेच्या मनाचा थांग लावण्याचा प्रयत्न करत आपापले आखाडे मजबूत करण्यासाठी राजकीय पक्षांची लगबग वाढू लागली. आता प्रत्यक्ष तारखा जाहीर झाल्यामुळे घोडामैदान अगदी जवळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्वाभाविकच आपलेच घोडे पुढे दामटण्यात कोणीही मागे पडणार नाही. राज्यातील निवडणूक एकाच टप्प्यात होणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर असेल. चार नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची तारीख असणार आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडेल तर २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होईल. एकूण २८८ जागांसाठी ९ कोटी ६३ लाख मतदार आपले मत नोंदवतील. त्यात नवमतदारांची संख्या २०.९३ लाख इतकी आहे. पुरूष मतदार ४.९७ कोटी, महिला मतदार ४.६६ कोटी, युवा मतदार १.८५ कोटी, तृतीयपंथी मतदार ५६ हजारांहून अधिक, ८५ वर्षांवरील मतदार १२.४८ लाख, शंभरी ओलांडलेले मतदार ४९ हजारांहून जास्त, दिव्यांग मतदार ६.३२ लाख अशी आकडेवारी असणार आहे. राज्यात एकूण एक लाख १८६ मतदान केंद्रांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यातील शहरी मतदार केंद्रांची संख्या ४२,६०४ इतकी आहे तर ५७,५८२ ग्रामीण मतदार केंद्र आहेत. एका मतदान केंद्रावर सरासरी ९६० मतदार मतदान करतील.

मतदानाच्या या पूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डींग होणार आहे. खेरीज ८५ पेक्षा अधिक वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना घरातूनच मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांना निवडणूक आयोगाचा एक फॉर्म भरावा लागेल. त्याचबरोबर निवडणूक आयोगाच्या वतीने 'सुविधा पोर्टल' नावाने ॲप जारी करण्यात आले आहे. या ॲप्लिकेशनवर मतदारांना तक्रार करता येईल. एखाद्या ठिकाणी काही अनुचित घटना घडली किंवा उशिरापर्यंत मतदान सुरु असेल तर केवळ फोटो काढून या ॲप्लिकेशन्सवर अपलोड केल्यास ९० मिनिटांमध्ये निवडणूक आयोगाची टीम तिथे पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. आता महायुतीमधील भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे अजित पवार हे एका बाजूने तर दुसरीकडे काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे शरद पवार मैदानात उतरण्यास सज्ज आहेत. लोक त्यातील कोणाची निवड करतात आणि सत्तेची माळ कोणाच्या गळ्यात घालतात हे लवकरच कळेल. त्यात, मनसे आणि वंचित बहुजन आघाडीने आघाडी घेत अनुक्रमे सात आणि २१ उमेदवार जाहीर केले आहेत.

महायुतीनेही जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. महायुतीसमोर सत्ता कायम राखण्याचे आव्हान आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला मतदारांनी जोरदार दणका दिला. 'मिशन ४५' हाती घेत निवडणूक लढवणाऱ्या महायुतीला केवळ १७ जागांवर यश मिळाले, तर महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. लोकसभेला पिछेहाट झाल्यानंतर महायुती सरकारने लोकानुनयी घोषणांचा अक्षरश: धडाका लावला. गेल्या आठवडाभरात जवळपास १४०० शासन निर्णय घेण्यात आले. घोषणांचा पाऊस पाडणाऱ्या महायुतीने विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप जवळपास निश्चित केले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप १५८ जागांवर निवडणूक लढवेल. युवा स्वाभिमानी पक्ष तसेच राष्ट्रीय समाज पक्षाला भाजप आपल्या कोट्यातून जागा देईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ७० जागा देण्यात येणार आहेत तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ५० जागा सोडण्यात येणार आहेत. लोकसभेला भाजपने ४८ पैकी २८ जागा लढवल्या होत्या. आता विधानसभा निवडणुकीतही भाजप सर्वाधिक जागा लढवणार आहे.

लोकसभेला भाजपने सर्वाधिक जागा लढवल्या होत्या. त्यानंतर शिंदे सेनेला १५ आणि अजित पवारांना पाच जागा देण्यात आल्या होत्या. आताही शिंदेसेनेला अजित पवार गटापेक्षा अधिक जागा मिळणार आहेत. अजित पवार गट ६५ ते ७० जागांसाठी तर शिंदे गट ९० ते १०० जागा लढवण्यासाठी उत्सुक होता; पण दोन्ही मित्रपक्षांना अपेक्षेइतक्या जागा मिळणार नाहीत. २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाने २६० जागांवर उमेदवार दिले होते. त्यातील १२२ जागा भाजपने जिंकल्या होत्या. २०१९ मध्ये भाजपने १६४ जागा लढवत १०५ जागांवर बाजी मारली. सलग दोन निवडणुकांमध्ये भाजपने शंभरचा टप्पा ओलांडला. सलग दोनदा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरण्याची किमया भाजपने करून दाखवली. भाजपने राज्यात पहिल्यांदाच अशी कामगिरी केली. आता त्याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचे आव्हान भाजपसमोर आहे. या वेळी कमी जागा लढवणाऱ्या भाजपपुढे शंभरी गाठण्याचे आव्हान आहे. विशेषत: शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसपुढेही आहे त्या जागा टिकवण्याचे आव्हान आहे.

मागील लोकसभा निवडणुकीमध्ये केवळ एक जागा जिंकणारी काँग्रेस १३ जागांवर पोहोचल्याने पक्ष कार्यकर्त्यांचा, नेत्यांचा उत्साह चांगलाच वाढला. प्रमुख नेत्यांनी पुढील मुख्यमंत्री काँग्रेसचाच, असे म्हणत दावा करण्यास सुरुवात केली; पण हरियाणामध्ये काँग्रेसला दणका बसला. सगळी सर्वेक्षणे पक्षाच्या बाजूने असूनही भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. त्यानंतर काँग्रेस काहीशी बॅकफूटवर गेली आहे. जागावाटपावरून वाद टाळा, मुख्यमंत्रिपदावर बोलू नका, अशा सूचना दिल्लीतील नेतृत्त्वाकडून राज्यातील नेत्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता काँग्रेस नेत्यांनी जुळवून घेण्याची भाषा सुरू केली आहे. महायुती सरकारने आणलेल्या लोकानुनयाच्या योजना, दलित आणि आदिवासी पुन्हा भाजपकडे जाण्याची शक्यता, मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मनोज जरांगे यांनी महायुतीचे उमेदवार पाडण्याचा दिलेला इशारा आणि त्याविरोधात जरांगे यांच्या पाठिशी असणाऱ्या पक्षाविरोधात भूमिका घेण्याचा ओबीसी संघटनेचा पवित्रा, धनगर आरक्षणाचा न सुटलेला प्रश्न तसेच आदिवासी समाजामध्ये आरक्षणात वाटेकरी येण्याची असलेली भीती अशा मुद्द्यांवर निवडणूक रंगणार आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची ऐन निवडणुकीच्या काळात झालेली अँजियोप्लास्टी, त्यामुळे त्यांना प्रचारात येणाऱ्या मर्यादा हे महाविकास आघाडीपुढील मोठे आव्हान असेल.



गेल्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक राजकीय भूकंप झाले. सर्वात आधी शिवसेनेतील अंतर्गत बंडाळी, त्यानंतर सत्तेत असलेले महाविकास आघाडी सरकार कोसळणे, शिंदे यांनी भाजपच्या साथीने महायुती सरकार स्थापन करून स्वतः मुख्यमंत्रिपदी विराजमान होणे, त्यानंतर अजित पवार यांच्या बंडानंतरची राष्ट्रवादीतील फूट तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अनुक्रमे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ठोकलेला दावा या सर्व घडामोडी राज्याच्या राजकारणाला हादरे देणाऱ्या ठरल्या. त्यामुळे मतदारराजा या वेळी राज्याचे सिंहासन कुणाच्या हवाली करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये पिपाणी चिन्हावर बंदी नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये पिपाणीचा पुन्हा तुतारीला फटका बसण्याची शक्यता आहे. तुतारी हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे चिन्ह आहे; मात्र लोकसभा निवडणुकीत पिपाणीमुळे तुतारीला फटका बसल्याची तक्रार शरद पवार गटाने केली होती. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दहा जागा लढवल्या. तेव्हा चार लाखांहून अधिक मतदान पिपाणीला पडले होते. विशेषतः सातारा मतदारसंघात पिपाणी या चिन्हामुळे त्यांच्या उमेदवाराला पराभवाचेही तोंड पहावे लागले होते. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन शरद पवार गटाने पिपाणी चिन्ह गोठवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती; मात्र निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह कायम ठेवले. तुतारी वाजवणारा माणूस लहान आणि अस्पष्ट दिसतो. त्याचा आकार वाढवण्यात यावा, ही मागणी मात्र आयोगाने मान्य केली. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांमध्ये घडले, ते अनेक दशकांपासून घडले नव्हते. महाराष्ट्राला एक चांगली राजकीय संस्कृती आहे, असे सुरूवातीपासून मानले जात आहे. असे असले, तरी या संस्कृतीला आता खरेच गालबोट लागले आहे का, राजकारणात घडलेल्या घडामोडींवर लोकांचा रोष आहे का हे आता निवडणुकीतून समोर येणार आहे. निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारच्या प्रचारात विकासकामे, लाडकी बहीण योजनांसारख्या विविध मोठ्या घोषणा केंद्रस्थानी राहतील, तर महाविकास आघाडीच्या प्रचारात पक्षफोडीचा तसेच सर्वधर्मसमभावाचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो.

साहित्य मैफल

देशांतर्गत उद्योग, कारखानदारी निर्धोक चालावी अशी इच्छा असेल, तर बँका सुस्थितीत असणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यापार-उद्योगासाठी दिलेल्या कर्जांची वसुली वेळेत होणे आवश्यक आहे. २०१६ मध्ये आलेल्या इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोडमुळे कर्जबाजारी कंपन्यांचे लवकरात लवकर पुनर्वसन होऊन त्या सक्रिय होणे अपेक्षित होते. आज आठ वर्षांनंतर या कोडमुळे नेमके काय साधल्याचे दिसते?

# आयबीसीने काय साधले?



परामर्ष

हेमंत देसाई

ज्येष्ठ पत्रकार

कर्ज थकवणाऱ्या कंपन्यांच्या दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेत कर्जे देणाऱ्या बँका आणि वित्तीय संस्थांना फटका बसतो. त्यांनी दिलेल्या कर्जरकमेवर पाणी सोडावे लागण्याचे म्हणजेच 'हेअरकट'चे प्रमाण २०२३-२४ मध्ये ७३ टक्क्यांपर्यंत वाढले. म्हणजेच प्रत्येक थकित शंभर रुपयांमध्ये केवळ २७ रुपयेच वसूल होत आहेत. २०२२-२३ मध्ये 'हेअरकट'चे प्रमाण ६४ टक्के होते. म्हणजे ३६ टक्के रक्कमच वसूल होत होती. या प्रक्रियेत बँकांना होणारा भुर्दंड प्रचंड असून शेवटी हे पैसे सर्वसामान्य ठेवीदारांचेच असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने म्हणजेच 'एनसीएलटी'ने २०२४ मध्ये २६९ प्रकरणांचे निराकरण केले, जे वर्षभरापूर्वीच्या कालावधीत निराकारण झालेल्या १८९ प्रकरणांपेक्षा जास्त होते, असे 'इक्रा' या पतमानांकन संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे.

आज यासंदर्भात नव्याने दाखल प्रकरणे २०२२-२३ मधील १२६३ वरून २०२३-२४ मध्ये ९८७ पर्यंत घसरली आहेत. परंतु कोविड टाळेबंदी आणि त्या कारणाने ठप्प पडलेल्या आर्थिक चक्राचा ताण आल्यामुळे २०२२-२३ या आर्थिक वर्षात दाखल प्रकरणांचे प्रमाण जास्त होते. एकूण थकलेली देणी पाहता, कर्ज देणाऱ्या बँका आणि वित्तीय संस्थांना या प्रकरणात सोसावे लागणारे नुकसान काळजी वाटावे इतपत आहे. विशेषतः कंपन्यांच्या दिवाळखोरीच्या निराकरणाच्या बाबतीत हा प्रश्न गंभीर बनला असून बोलीदाराला मालमत्ता कोणत्या मूल्यावर मिळत आहेत, याबद्दल काळजी वाटणे स्वाभाविकच आहे. इतक्या स्वस्तात मालमत्ता मिळत असतील, तर काहीजणांना शंकाही वाटू शकते. आयबीसी प्रक्रियेद्वारे निराकारणासाठी लागणारा सरासरी वेळ २०२३-२४ मध्ये वाढून ८४३ दिवसांवर पोहोचला आहे. अगोदरच्या वर्षात सरासरी वेळ ८३१ दिवस इतका होता. खरे तर, दिवाळखोरी कायद्यानुसार कालबद्ध निराकरणाची कमाल मर्यादा ही ३३० दिवसांची आहे. परंतु प्रत्यक्षात लागणारा वेळ हा अडीचपट अधिक आहे. 'इक्रा'च्या कर्जदात्या बँकांची सरासरी वसुली विद्यमान २०२४-२५ या आर्थिक वर्षातही ३० ते ३५ टक्क्यांच्या आत बाहेर राहील, असा अंदाज आहे.

आयबीसी कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कर्जवाटप व्यवस्थित झाले तसेच एनपीए किंवा थकित कर्जाचे प्रमाण घटले. बड्या बड्या कॉर्पोरेट कंपन्यादेखील आपली कर्ज फेडण्याबाबत तुलनेने अधिक सजग झाल्या, हे खरे आहे. यापूर्वीही दिवाळीखोरी आणि कर्ज पुनर्रचना यासाठीची सोय होती. पण त्या प्रक्रियेत गुंतागुंत बरीच होती. त्यामुळे व्यवसायांना आणि बँकिंग क्षेत्राला थकित कर्जाबद्दल निर्णय घेणे जरा त्रासाचे होत असे. केंद्र सरकारने 'ईझ ऑफ डुइंग बिझिनेस' म्हणजेच सुलभतेने व्यवसाय करण्याच्या उद्देशाने नादारीविषयीचे कालबाह्य नियम बदलले आणि नवी संहिता लागू केली. परिणामी आणि अन्य काही कारणांमुळे 'ईझ ऑफ डुइंग बिझिनेस'मध्ये आंतरराष्ट्रीय मानांकनात भारताची क्रमवारी १४२ वरून ६३ अशी सुधारली.

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे अनेक व्यवसाय आकाराला येत असून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. बँका आणि एनबीएफसी, म्हणजेच वित्तीय बँकेतर संस्थांनी विशेष कर्ज योजना आखून कर्जाची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. उद्योगक्षेत्र, व्यक्ती आणि नवउद्योजक या सर्वांच्या पतविषयक गरजा पूर्ण होऊ लागल्या. २०१६ मध्ये अस्तित्वात आल्यापासून पुढील थकित कर्जांच्या एकूण प्रकरणांपैकी ७२ टक्के प्रकरणे सोडवण्यात आली आहेत. विदेशी गुंतवणुकीचे सर्वाधिक पसंतीचे स्थान म्हणून भारताची ओळख आहे. शिवाय अन्य देशांच्या तुलनेत भारतात व्याजदर अधिक असल्यामुळे गुंतवणूकदारांना त्याचेही आकर्षण असते. परंतु नादारी निराकरणाच्या प्रक्रियेसाठी सगळ्या प्रकारचे सहकार्य करूनही काही कंपन्यांचे संचालक निराकरण अधिकाऱ्यांच्या विरोधात पोलिसात तक्रारी दाखल करतात.

२०21 मधील एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नादारी निराकरण प्रक्रियेत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अटकेवर नाराजी व्यक्त केली होती आणि त्यांना पोलीस कोठडीतून सोडवलेही होते. दुसरे उदाहरण घडले, ते एका कला दिग्दर्शकाला देण्यात आलेल्या कर्जाबाबत. त्याला १८२ कोटी रुपयांची कर्जे स्टुडिओसाठी देण्यात आली. त्यांनी २०२० मध्ये या कर्जांची परतफेड करण्याचे थांबवल्यामुळे थकबाकी २५२ कोटी रुपयांवर गेली. कारण त्यात अर्थातच व्याज आणि दंडात्मक व्याजाचा समावेश होता. संबंधित असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीने या कंपन्यांशी संबंधित समस्या हाताळणाऱ्या एनसीएलटी या विशेष न्यायालयाकडे याचिका दाखल केली. ती मान्य करण्यात आली. एनसीएलटीच्या आदेशानुसार संबंधित कंपनीला मालमत्तेचे हस्तांतरण किंवा विक्री करण्यास मनाई करण्यात आली. नादारीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही स्थगिती राहणार होती. दरम्यान, कर्ज घेणाऱ्या व्यक्तीने, म्हणजेच कलादिग्दर्शकाने आत्महत्या केली. त्याबरोबर कर्ज देणाऱ्या संबंधित कंपनीच्या अध्यक्ष आणि अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. एखाद्या व्यक्तीने आत्महत्या करणे, हे दुर्दैवी असले, तरीदेखील कर्जवसुली करावीच लागते, याचे भान ठेवले पाहिजे. अशा प्रकरणात राजकीय किंवा अन्य हस्तक्षेप झाल्यास स्टार्ट अप आणि नव्या उद्योजकांसाठी आवश्यक ते भांडवल पुरवण्यात बँका आणि एनबीएफसी यांच्याकडून हात आखडता घेतला जाऊ शकतो. एकूण, कर्ज निराकरण प्रक्रियेतील दिरंगाई संपली पाहिजे आणि थकित रकमेची जास्तीत जास्त वसुली होण्याची गरज आहे, हे विसरता कामा नये.

कर्ज देणारे पेमेंट डिफॉल्ट दर्शवणारी बँक स्टेटमेंट तयार करू शकतात तर कर्जदार आर्थिक अडचणी किंवा कराराच्या जबाबदाऱ्यांवरील विवाद दर्शवणारे आर्थिक रेकॉर्ड सादर करू शकतात. आवश्यक असल्यास न्यायाधिकरण विवादाचे मुद्दे स्पष्ट करण्यासाठी आणि सर्व संबंधित तथ्यांची कसून तपासणी केल्याची खात्री करण्यासाठी परीक्षांचे आयोजन करते. कर्ज परतफेडीच्या अटींवरील विवादात, डीआरटी कर्जदाराच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी किंवा पेमेंट इतिहासाची पडताळणी करण्यासाठी बँकिंग रेकॉर्डची छाननी करण्यासाठी आर्थिक तज्ज्ञांना बोलावू शकते. ही सूक्ष्म तपासणी सुनिश्चित करते की निर्णय तथ्यात्मक अचूकता आणि कायदेशीर व्याख्यांवर आधारित आहेत. औपचारिक निर्णयाबाहेरील पक्षांमधील ऐच्छिक समझोता सुलभ करण्यासाठी डीआरटी सक्रिय रहात मध्यस्थीला प्रोत्साहन देतात. मध्यस्थी प्रक्रिया कर्जदार आणि कर्जदारांना परस्पर स्वीकार्य ठराव साध्य करण्याच्या उद्देशाने रचनात्मक वाटाघाटींमध्ये व्यस्त राहण्यास प्रोत्साहित करतात. हा दृष्टिकोन केवळ खटल्यातील खर्च कमी करण्यात मदत करत नाही, तर दीर्घकाळापर्यंत कायदेशीर लढाया टाळून कर्जवसुलीची प्रक्रिया जलद करते. उदाहरणार्थ, कर्जदार आणि कर्जदार परतफेडीच्या वेळापत्रकांची पुनर्रचना करणे किंवा मालमत्ता हस्तांतरण किंवा आंशिक देयकांसह, सेटलमेंटच्या पर्यायी पद्धतींवर सहमत होणे यासारखे पर्याय शोधू शकतात. यशस्वी मध्यस्थीचा परिणाम परस्परसंमतीच्या अटींमध्ये होतो, ज्यांचे संमती ऑर्डरमध्ये औपचारिक रूपांतर होते.

कर्जवसुली न्यायाधिकरणाने घेतलेल्या निर्णयांवर अपील करण्याचा कर्जदारांना अधिकार आहे. 'डीआरटी'च्या निर्णयाचे पुनरावलोकन करणाऱ्या डेट रिकव्हरी अपील न्यायाधिकरण (डीआरएटी)समोर अपील सामान्यत: दाखल करणे आवश्यक असते. अपीलीय कार्यवाही कर्जदारांना प्रतिकूल निर्णयांना आव्हान देण्याची आणि उच्च न्यायालयीन छाननीद्वारे निराकरण करण्याची संधी देते. 'डेट रिकव्हरी ट्रिब्युनल'समोर होणारी मध्यस्थीची कार्यवाही पक्षांमधील ऐच्छिक समझोता सुलभ करून औपचारिक निर्णयासाठी प्रभावी पर्याय देते.

◇◇◇

'ग्रेन बाऊल' म्हणून ओळखला जाणारा पंजाब भारतीय शेतीचा आधारस्तंभ आहे. तिथली सुपीक माती आणि समर्पित शेतकरी दरवर्षी लाखो टन धान्याचे उत्पादन करतात, जे भारताच्या अन्न गरजा पूर्ण करतातच पण निर्यातीतही योगदान देतात. असे असले तरी हवामानबदल, पाण्याचा अतिवापर आणि जमीन वापरातील बदल यासारख्या घटकांमुळे पंजाबच्या शेतजमिनीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता समोर आली आहे.

# पंजाबचे वाळवंट?

विशेष

प्रा. अशोक ढगे

शेतीमध्ये उच्च उत्पादन मिळवण्यासाठी पंजाबमध्ये नायट्रोजन, फॉस्फेट आणि पोटॅश यासारख्या खतांचा सर्वाधिक वापर केला जातो. केंद्रीय रसायन आणि खते मंत्रालयाने ६ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, पंजाबने २०२३-२४ मध्ये प्रति हेक्टर २४७.६१ किलो खताचा वापर केला. हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी (१३९.८१ किलो प्रति हेक्टर)च्या जवळपास दुप्पट आहे. पंजाबमध्ये भारतातील केवळ १.५३ टक्के कृषी क्षेत्र असले, तरी देशात वापरल्या जाणाऱ्या एकूण खतांपैकी नऊ टक्के खतांचा वापर होतो. आकडेवारीनुसार, एनपीके (नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम) खतांचा वापर गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८) १८० टक्क्यांनी वाढला आहे. याच चार दशकांमध्ये एकट्या पंजाबमध्ये युरिया (नायट्रोजन)चा वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. त्याच अहवालानुसार भात आणि गव्हासाठी युरियाचा वापर अनुक्रमे ०.९ क्विंटल आणि १.१ क्विंटल प्रति एकर (०.४ हेक्टर) असावा; परंतु येथिल शेतकरी साधारणपणे यापेक्षा ०.४-०.६ क्विंटल अधिक वापरतात. १९८० ते २०१८ दरम्यान राज्यात खतांच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याउलट या काळात धानाच्या उत्पादनात केवळ ६८ टक्के तर गव्हाच्या उत्पादनात ८५ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय भूजल पातळीतही सातत्याने घट होत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यासाठी ५०० फुटांपर्यंत कूपनलिका खोदावी लागत आहे. हरित क्रांतीने भारताला अन्न उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यास मदत केली; परंतु त्याचे कृषी आणि पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम झाले. या क्रांतीचा सर्वात मोठा परिणाम पंजाबमध्ये दिसून येत आहे.

पंजाबमध्ये पहिल्यापासूनच भात आणि गव्हाच्या लागवडीला प्राधान्य दिले गेले. या एकतर्फी दृष्टिकोनामुळे शेतकरी या पिकांवर जास्त अवलंबून आहेत, परिणामी कृषी विविधता कमी झाली आहे. याव्यतिरिक्त, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. पंजाबमध्ये पूर्वी मका, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, तेलबिया आणि भाजीपाला तसेच दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत होते. यामुळे शेतकरी कुटुंबांना स्थिर उत्पन्न आणि संतुलित अन्न उपलब्ध झाले. या बहुआयामी शेतीव्यवस्थेने शेतकऱ्यांना स्वावलंबी ठेवले. त्यामुळे ते बाजारपेठेवर कमी अवलंबून राहिले. १९८० च्या दशकापूर्वी, शेतकरी काडेपेटी, मीठ आणि मसाले यासारख्या छोट्या वस्तू बाजारातून विकत घेत असत, कारण ते त्यांच्या शेतीतून इतर सर्व गरजा भागवत. त्या काळात शेतीमुळे जमिनीची सुपीकता तर राहिलीच; शिवाय शेतकरी कुटुंबांचे आरोग्यही राखले गेले. म्हणूनच जास्त भात आणि गहू पिकवल्याने पंजाबची शेती वाळवंटात बदलत आहे का, असा प्रश्न आता उत्पन्न होत आहे. पंजाबच्या शेतांना



वाळवंटात बदलण्यात भात आणि गव्हाच्या अतिशेतीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अधिकृत अहवालांनुसार, जास्त निचरा, जमिनीची गुणवत्ता ढासळणे आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे येथिल जमिनीची सुपीकता कमी झाली आहे.

पंजाब कृषी विभागाच्या अहवालात हे स्पष्ट करण्यात आले आहे, की हवामानबदल आणि अस्थिर मॉन्सूनमुळे जलसंकट अधिक गडद होत आहे. त्यामुळे शेतजमिनीच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. दीर्घकालीन मोनोक्रॉपिंग पद्धतींमुळे मातीची विविधता नाहीशी झाली असून जलस्त्रोतांवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीमुळे योग्य उपाययोजना न केल्यास पंजाबमधील शेतीची जमीन एक दिवस अक्षरशः वाळवंटी भागात बदलू शकते. देशासाठी अन्नधान्य निर्माण करणाऱ्या पंजाबचे वाळवंट होण्यामागे काही कारणे आहेत. एकाच पिकाची (जसे भात आणि गहू) सतत वाढ केल्याने जमिनीतील पोषक तत्वांची विविधता कमी होते. त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर वाढवला आहे. रासायनिक खतांचा दीर्घकाळ वापर केल्याने जमिनीतील संतुलन बिघडते आणि नैसर्गिक सुपीकता कमी होते. भातशेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. यामुळे भूजल पातळी कमी होते आणि पाण्याचे संकट निर्माण होते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. सतत पीक घेतल्याने मातीची धूप वाढते. त्यामुळे त्याची रचना आणि पोषण कमी होते. पीक विविधतेच्या अभावामुळे कीड आणि रोगांचा दबाव वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक कीटकनाशके वापरण्यास भाग पाडले जाते. त्याचा परिणाम माती आणि पाण्याच्या स्त्रोतांवरही होतो.

वस्तुत: शेतकऱ्यांना धान आणि गव्हाऐवजी डाळी, तेलबिया किंवा फळे आणि भाजीपाला यासारखी इतर पिके घेण्यास प्रवृत्त केल्यास जमिनीची सुपीकता वाढेल आणि फायदेही मिळतील. जमिनीच्या गुणवत्तेनुसार खतांची निवड करून समतोल वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करण्यावर भर दिल्यास भूजल पातळीत सुधारणा होईल. सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता राखण्यात मदत होऊ शकते. शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान आणि पद्धतींबद्दल शिक्षित करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. आकडेवारीनुसार, गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८ दरम्यान) एनपीके खतांचा वापर १८० टक्क्यांनी वाढला आहे. त्याच वेळी, १९८० ते २०१८ या काळात केवळ युरियाचा (नायट्रोजन) वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. येथे शेतात खतांचा अतिवापर होणे हे आता गुपित राहिलेला नाही. शेतकरी खतांचा वापर एका रात्रीत कमी करू शकत नाहीत. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे संथपणे चालत असावी, अन्यथा उत्पादनात मोठी घट होईल. यानंतर कीटकनाशकांचा क्रमांक येतो. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रानंतर पंजाब हे रासायनिक कीटकनाशकांचा देशातील तिसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. खतांसोबतच कीटकनाशकांचा वापरही वाढतो.

खतांच्या अतिवापरामुळे वनस्पतीवृद्धी वाढते. म्हणजेच पीक गडद हिरवे होते. त्यामुळे कीटकांचे आक्रमण आणि रोग अधिक आकर्षित होतात. पानातील द्रवपदार्थ हे कीटकांचे अन्न आहे. पान जितके जाड असेल, तितके कीटक आणि कृमींचे अन्न जास्त असते. बर्नाला जिल्ह्यात वसलेले पट्टी खट्टर हे गाव सतलज नदीच्या दक्षिणेस पंजाबच्या माळवा भागात आहे. 'सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डा'च्या मूल्यांकनानुसार, येथिल बहुतांश ब्लॉक्स 'डार्क' झोनमध्ये येतात. ते भूजलाच्या अति-शोषणाची पातळी दर्शवतात. तांदळामुळे पंजाबचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्याचे वाळवंटात रुपांतर होत आहे. पंजाबमध्ये १४ लाख कूपनलिका भातपिकाच्या हंगामात आठ तास चालतात. एक हेक्टर जमिनीवर एक इंच पाणी म्हणजे एक लाख लिटर. पंजाबमध्ये भाताच्या हंगामात किमान ४-५ इंच पाणी साचत राहते. दर वर्षी राज्यातील पाण्याची पातळी ३-५ फुटांनी घसरते. भूजल पातळी कमी होण्याचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय समितीने २०२१ मध्ये भूजल उत्खननाची सध्याची प्रवृत्ती कायम राहिल्यास पुढील २५ वर्षांमध्ये राज्य वाळवंटात बदलेल, असा अंदाज वर्तवला आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्याच्या गरजेने भारतात हरितक्रांतीची सुरुवात झाली आणि त्यासोबतच तांदूळ गहू पीक प्रणाली आली. तिथे एकाच जमिनीवर वारंवार ही पिके घेतली जातात.

१९६० पासून सादर केलेल्या उच्च-उत्पादक वाणांनी भारताला अन्न सुरक्षा प्राप्त करण्यास मदत केली आणि ती राखण्यात मोठी भूमिका बजावली. अनुदानित खतांमुळे याला आणखी चालना मिळाली आणि पंजाब हा देशातील सर्वाधिक लागवडीचा प्रदेश बनला. यामुळे शेतीतील भुस्सा जाळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, मातीतील सूक्ष्मजीव क्रियाकलाप बिघडला आणि जमिनीतील मायकोरिझा (एक प्रकारची बुरशी) नष्ट झाली. मातीमध्ये मायकोरिझाईची भूमिका वनस्पतींच्या मुळांना अधिक पोषक द्रव्ये शोषण्यास मदत करते. पंजाब आणि हरियाणामध्ये दर वर्षी ऑक्टोबरचा उत्तरार्ध ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत भाताचे कापणीनंतरचे अवशेष जाळण्याचे प्रमाण व्यापक आहे, कारण शेतकऱ्यांना १०-१५ दिवसांच्या कालावधीत भात कापणी आणि गहू पेरणे आवश्यक असते. मायकोरायझी नायट्रोजनचे अमोनियममध्ये रूपांतर करतात, जे झाडे शोषून घेतात आणि वापरू शकतात. २०२२ मध्ये पंजाब कृषी विद्यापीठाने मातीचाचणी केली तेव्हा जमिनीत पोटॅशचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. ही समस्या खूप गंभीर आहे. अशा अनेक समस्यांवर मात करण्याचे आव्हान पंजाबपुढे आहे आणि ते क्लौशल्याने पेलावे लागणार आहे.

◇◇◇

## अधिकाऱ्यांनी संवादात दिली कर्तव्याची माहिती
# विद्यार्थ्यांनी समजून घेतले मनपाचे कामकाज

**समाचार/नगर-दि.१९**




महापालिका ही स्वयंसंस्था असून शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी काम करत असून दैनंदिन साफसफाई, पथदिवे, पाणीपुरवठा, आरोग्य याचबरोबर राज्य व केंद्र सरकार यांच्या विविध योजना शहरांमध्ये यशस्वीपणे कशा राबविल्या जातात तसेच महापालिका अधिकारी, कर्मचारी यांचे कर्तव्य काय असते? लोकसंख्येनुसार महापालिकेचे वर्गीकरण कसे केले जाते? नगरसेवक, महापौर यांचे अधिकार याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. शहरातील संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महापालिका कार्यालयातील प्रत्येक विभागाला भेट देत कामकाजाची माहिती घेतली.

विद्यार्थी हा उद्याच्या भारताचे भवितव्य असून आपल्या कर्तव्याची माहिती होणे गरजेचे आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी पुढे येत अधिकाऱ्यांना प्रश्न विचारले असून विद्यार्थांना सामाजिक प्रश्नांची जाणिव दिसून आल्याची माहिती आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे यांनी दिली संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांची महापालिका कार्यालयाला भेट देत कामकाजाची माहिती घेतली यावेळी आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, कैलास मडके, शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन याची माहिती देत शपथ दिली व पर्यावरण संतुलनाचे महत्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी कुतूहलाने मनपाच्या विविध विभागांची पाहणी करत कामकाजाची माहिती घेतली.

# टेबल टेनिस स्पर्धेत साक्षी पवारला रौप्य पदक

**समाचार/नगर-दि.१९**




दि.१४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या सुभाष बापट मेमोरियल चॅम्पियनशिप टेबल टेनिस स्पर्धेत साक्षी पवार हिने रौप्य पदक पटकाविले.

डेक्कन जिमखाना, पुणे येथे पार पडलेल्या या स्पर्धेत मुलींच्या १९ वर्षे वयोगटात साक्षी पवार हिने उत्कृष्ट खेळ केला. तिने आपल्या खेळात फोरहँड टॉपस्पिन बॅकहँड टॉपस्पिन व सर्व्हिसेसचा चांगला उपयोग करत रौप्य पदक पटकावले. तिला ट्रॉफी, रौप्य पदक, रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यापूर्वीही तिला अनेक राष्ट्रीय स्पर्धा खेळण्याचा मान मिळाला आहे. इंदोर येथील राष्ट्रीय स्पर्धेत तिने पाचवे स्थान पटकाविले होते. राष्ट्रीय स्पर्धेबरोबरच राज्यस्तरीय स्पर्धेत तिने अनेक वेळा सुवर्णपदक, रौप्य पदक व कांस्यपदक पटकाविले आहेत.

साक्षी पवार रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशन या कॉलेजची विद्यार्थिनी असून बारावी सायन्सला शिकत आहे. साक्षीला क्रीडा मार्गदर्शक अजित लोळगे व एन. आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्रांझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक किरण पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

## जिल्हा ग्राहक आयोगाची वर्षभरात लक्षणीय कामगिरी!
# गतिमान कार्यशैलीने एका वर्षात तब्बल ६00 प्रलंबित प्रकरणे निकाली

**ग्राहक संरक्षण कायदा २४ डिसेंबर १९८६ मध्ये मंजूर झाला. त्यानुसार ग्राहक हितरक्षणाचे काम ग्राहक तक्रार निवारण आयोगामार्फत करण्यात येते. प्रज्ञा हेंद्रे-जोशी यांनी अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार हाती घेऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. या काळात या आयोगाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र सकारात्मक बदल झाला व ती गतिमान झाली. वर्षभरात ६00 पेक्षा जास्त खटले निकाली निघाले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील आयोगाच्या कामकाजाबाबत या लेखाद्वारे माहिती आपण घेऊयात!**



'ग्राहक संरक्षण कायदा' या नावातच या कायद्याचा हेतू व उद्दिष्ट लक्षात येते. अनुचित व प्रतिबंधित व्यापारी व्यवहारांपासून ग्राहकांचे संरक्षण करणे, यात अभिप्रेत आहे. केंद्र सरकारने 'ग्राहक संरक्षण कायदा २०१९' हा नवीन कायदा आणला व तो २० जुलै २020 पासून संपूर्ण देशभर लागू केला गेला. ग्राहकांना विविध सेवा व उत्पादने पुरवणाऱ्या विक्रेत्यांविरुद्धच्या तक्रारी ऐकून त्यांना नैसर्गिक न्यायाची पुरेपूर संधी देत न्यायदानाची व्यवस्था म्हणजेच ग्राहक तक्रार निवारण आयोग होय. प्रत्येक जिल्ह्यात हा आयोग कार्यरत आहे. आपल्या अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा म्हणून प्रज्ञा हेंद्रे-जोशी या कार्यरत आहेत. तसेच सदस्या म्हणून चारू डोंगरे व संध्या कसबे या काम पाहत आहेत. या आयोगाचा ग्राहकांशी सुसंवादी धोरणामुळे सामान्य तक्रारदारही स्वतःची बाजू मांडण्यासाठी वकिलांच्या मदतीशिवाय तयार होत आहे. 'जागो ग्राहक जागो' हे शासकीय ब्रीदवाक्य प्रत्यक्षात अस्तित्वात येत असल्याची ही सुचिन्हे आहेत. प्रज्ञा हेंद्रे-जोशी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेऊन वर्षपूर्ती झाली आहे. त्यांच्यासह असलेल्या दोन्ही सदस्यांत परस्परसमन्वय व सुसंवाद राखून ग्राहक आयोगाचे कामकाज सुरू आहे. आयोगाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल दिसत आहे. आयोगाच्या कार्यालयातील दप्तर मांडणी, स्वच्छता, विशेष म्हणजे वकील व पक्षकार यांना आपले म्हणणे मोकळेपणाने मांडण्यासाठी उपलब्ध असलेली स्वतंत्र बाररूम आदी बाबीत नैसर्गिक न्यायाची पुरेपूर संधी देऊन आयोगाने त्यांच्या कामकाजातील वेगळेपणाचा ठसा जनमानसावर मागील वर्षभरात उमटवला आहेक

ग्राहक कायद्यात ग्राहकाला सर्वोच्च महत्त्व आहे. आयोगाने हाच धागा पकडून आयोगाच्या कार्यालयाची रंगरंगोटी, स्वच्छतेकडे प्राधान्यक्रमाने लक्ष दिल्याचे निदर्शनास येते. पक्षकारांसाठी स्वतंत्र प्रतीक्षालय व कोर्टरूममध्ये अर्ज लिहिण्यासाठी टेबल, वकिलांसाठी वकील कक्ष, मध्यस्थी कक्ष, कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी प्रशस्त कार्यालय, फर्निचर व्यवस्था, रेकॉर्ड रूम व त्यातील कपाटांची व्यवस्था, कर्मचारी, पक्षकार व वकिलांसाठी स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. संगणक व्यवस्थेच्या माध्यमातून 'ई फायलिंग', दररोजचा बोर्डवर खटल्यांची सूची, तक्रार निवारण इत्यादी सुविधाही उपलब्ध करून दिल्याने तक्रार दाखल करून घेणे व तक्रारींचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी मदत होते. या कामी तक्रारदार व प्रतिपक्षाने वेळेत प्रक्रिया पूर्तता केल्यास तक्रारअर्जांचा निकाल कायद्याला अपेक्षित वेळेत करण्याचा अध्यक्षांचा प्रयत्न आहे. अध्यक्षांनी पदभार घेण्यापूर्वी अर्थात सप्टेंबर २0२३ पर्यंत या आयोगाकडे विविध प्रकारचे एकूण १६00 प्रकरणे प्रलंबित होती. वर्षभरात ६00 तक्रारी निकाली निघाल्या आहेत. आयोगाने आतापर्यंत दिलेल्या निकालपत्रांचे अवलोकन केल्यास निकालपत्रात कायदा व प्रत्यक्ष पुराव्याचा संदर्भ देऊन सर्वसामान्यांना समजेल इतक्या सोप्या भाषेत निकालपत्र देण्यात येते. त्यामुळे कायद्यातील क्लीष्टता टळली आहे. आयोगाने दिलेल्या निकाल पाहता त्यात विविध प्रकारची प्रकरणे दिसतात. कर्ज परतफेड करूनही कर्जमंजुरीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे ग्राहकास परत न देणे, विमा मंजूर करण्यास नकार देणे, सदोष बियाणे पुरवून शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान करणे व भरपाई देण्यास नकार देणे, टपाल विभागाच्या बचत खात्याचे 'पासबुक' व्यवस्थित भरून न देणे, शेतजमिनीची मोजणी मुदतीत न करणे आदी तक्रारींचा निकाल तक्रारदाराच्या बाजूने देऊन सेवा देणाऱ्या कंपन्यांना कर्तव्याची जाणीव करून देण्याबरोबरच आयोगाने नैतिक चपराक दिली आहे. आयोगाच्या या धोरणांमुळे ग्राहकराजा अधिकाधिक सजग होऊ लागला आहे. यातूनच ग्राहक, विक्रेते, सेवादार यांच्यात निकोप संबंध निर्माण होतील, अशी अपेक्षा करूयात.

### पित्याच्या मृत्यूनंतर शिल्लक औषधाचे पैसे परत!

एका तक्रारदाराने वडिलांसाठी घेतलेली औषधे वडिलांच्या मृत्यूनंतर शिल्लक राहिली होती. ती शिल्लक औषधे परत करून, त्यांच्या बिलाची रक्कम परत करण्याची मागणी त्याने विक्रेत्याकडे केली होती. मात्र या विक्रेत्याने नकार दिला. त्यानंतर त्याने ती तक्रार ग्राहक आयोगाकडे दाखल केली. आयोगाने तक्रारदाराचा अर्ज मंजूर करून शिल्लक राहिलेल्या औषधांची रक्कम नुकसानभरपाईसह देण्याचा आदेश दिला.

### आयोगाकडून ग्राहक जागृतीचे उपक्रम

ग्राहक आयोगाकडून दैनंदिन कामकाजाबरोबरच सामाजिक भान राखून वकील संघाच्या सहकार्याने राष्ट्रीय ग्राहक दिन, जागतिक ग्राहक दिनानिमित्त विविध उपक्रम राबवले जातात. त्याअंतर्गत ग्राहक प्रबोधन व्याख्यानमाला, चर्चासत्रे आयोजित केली जातात. वकील संघाच्या सहकार्याने वकिलांसाठी संबंधित विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे नेत्रदान शिबीर



**समाचार/नगर-दि.१९**

समदृष्टी समता विकास एवम् अनुसंधान मंडळ अर्थात सक्षम संस्थेतर्फे भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या संस्थेचे अध्यक्ष डॉ. रविंद्र चिटगोपेकर व त्यांचे सहकारी यांनी मंचच्या सभासदांची व ज्येष्ठ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी केली.

यावेळी सक्षम संस्थेचे अध्यक्ष श्रीधर बापट म्हणाले की, संस्थेची स्थापना २00८ मध्ये झाली. जवळपास ४३ प्रांतामध्ये ही संस्था कार्यरत असून एकवीस प्रकारचा दिव्यांगासाठी संस्था काम करते. शहरातील विविध शाळेत तसेच दिव्यांग शाळेत संस्थेतर्फे नेत्र तपासणी केली जाते. तसेच नगर जिल्ह्यामध्ये भारती कुलकर्णी, वर्षा रोडे, संध्या कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी, रामचंद्र जहागिरदार कार्यरत आहेत. मंच नेहमीच वेगवेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन करीत असते. त्यामध्ये करमणुकीचे कार्यक्रम, व्याख्याने, आरोग्य शिबीरे असे मंचाचे शरद कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी मंचातर्फे सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. मंचाचे शरद कुलकर्णी, मोरेश्वर मुळे, बाजीराव जाधव, सुरेश कुलकर्णी, शोभा ढेपे, पुष्पा चितांबर, स्नेहल वेलणकर आदी उपस्थित होते.

बाजीराव जाधव यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

# साकतमधील वराट महाविद्यालयात बी. फार्मसी पदवी अभ्यासक्रम

**समाचार/जामखेड-दि.१९**

संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या स्व. देवराव दिगांबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी साकत येथे डि फार्मसी अभ्यासक्रम सुरू आहे. या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन बी फार्मसी पदवी अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांच्याकडून मान्यता मिळाली आहे.

बी फार्मसी अभ्यासक्रमास ६0 विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. बी फार्मसी अभ्यासक्रम चार वर्षाचा आहे. या कॉलेज मुळे जामखेड परिसरातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक पदवी शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे.

स्व. देवराव दिगांबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी साकतमध्ये बी फार्मसीची प्रवेश प्रक्रिया दि. २५ आक्टोबरपासून सुरू होत आहे. सदर प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण मंडळाच्या नियमानुसार त्यांच्या वेबसाइटवर सुरू होणार आहे. तसेच शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. अरूण वराट यांनी दिली.

मागील वर्षी डी फार्मसी प्रथम वर्षाचा निकाल ९५ टक्के लागलेला आहे. तरी डी फार्मसी व बी फार्मसी पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्जत-जामखेडमधील ११ जणांनी जरांगेंकडे मागितली उमेदवारी


**समाचार/जामखेड-दि.१९**

कर्जत जामखेड मतदारसंघात दिवसें दिवस नवीन घडामोडी घडत आहेत. मराठा समाजाची उमेदवारी करण्यासाठी या मतदारसंघातून अकरा जणांनी संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे जाऊन उमेदवारी मागितली आहे.

अकरा उमेदवारामध्ये एका मुस्लिम समाजाच्या उमेदवाराचा समावेश आहे. उमेदवारीची मागणी करणारे काही जण महायुती व महाविकास आघाडीला मानणारे आहेत. जरांगे पाटील या मतदारसंघात उमेदवार देणार असल्याने त्याचा फटका पवार कि शिंदे यांना बसेल हे उमेदवार जाहीर झाल्यावर समजणार आहे.

कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघात महायुती विरूद्ध महाविकास आघाडी अशी लढत होईल अशी अपेक्षा होती. परंतु अचानक मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने हालचाली करून चार दिवसांपासून मुलाखती चालू केल्या आहेत. त्यामुळे कर्जत जामखेड मधून आमदार होण्याची इच्छा अनेकजण बाळगून आहेत. त्यातील अनेकजण महायुती व महाविकास आघाडीतील महत्त्वाचे समजले जाणारे पदाधिकारी व कार्यकर्ते आहेत.


## शब्दकोडे-३७



**आडवे शब्द**
१) घराचा मागचा दरवाजा
४) वही
६) समुद्र
८) हत्ती
१०) पुत्र
१२) मिठी, विळखा
१५) राजाने एकाद्यास दिलेला आश्रय
१७) रसाळ
१८) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
२०) इटलीची राजधानी
२२) माझे
२३) छोटे कुबड
२५) लोकांच्या मनातील विचार
२७) जा ये असणे
२९) सत्व
३०) उदा ज्ञानेश्वर, तुकाराम इ.
३१) बांबू
३२) अंगातील ज्वर
३३) पदार्थ थंड करण्याचे यंत्र
३५) पोट आणि गुडघ्याच्या सहाय्याने पुढे जाणे
४०) रग, मस्ती
४१) जंगलातील आग
४४) गवंड्याकडील एक साधन
४५) लोणी
४७) अक्कलकोट स्वामी
४९) भाकरी (ग्रा.)
५०) अभिनेत्री
५१) हळू, सावकाश, संथ
५२) मोहरी
५३) पटल
५५) पळसाचा डिंक
५८) कोर्टासमोर सांगणे
५९) चांदी
६१) प्रामाणिक, सज्जन
६२) द्रव्य
६३) होकाराचा शब्द
६४) पारंब्या असलेला एक वृक्ष

**उभे शब्द**
१) बिल्ला
२) बारीक काडी
३) मस्ती, जोम
५) कष्ट, मेहनत
६) छोटी तबकडी
७) दुर्लक्ष, क्षमा
९) वृद्धत्व
११) चुलता
१३) शरमिंदे होणे
१४) सुप्रसिद्ध होणे
१६) जेव्हा
१९) चित्रपटाचा पडदा
२०) छातीपासून बेंबी पर्यंत केसांची गेलेली रांग
२१) अंत:करण
२२) मौज करणे
२३) भरीव नसलेले
२४) तापाची पूर्वचिन्हे
२६) रस्ता
२८) **** प्रकारेण, कोणत्याही प्रकाराने
३०) राग आणणारे (वर्तन)
३४) अंतर, तफावत
३१) काम, नशीब
३४) युवक
३६) लक्ष्मीचे एक नाव
३८) वर्ष.(ग्रा.)
३९) योग्य, बरोबर
४१) मोठा जमीनदार
४२) वाहणारी हवा
४३) चव, लज्जत
४६) वराच्या बाजूकडील लोक
४७) धनवान
४८) सुसर
४९) हिंदीत भाऊ
५२) पैशाचा ढीग
५४) कडक व चिवट
५५) मनाचा ओढा
५६) चामखीळ
५७) मिठी, विळखा
५८) लहान
६०) एक बारीक धान्य

## शब्दकोडे-३६ चे उत्तर



### आ. महेश कसवाला; प्रचार व प्रसिध्दी आढावा बैठक

# भाजपाच्या सत्तेसाठी कटिबध्द व्हा

**समाचार/नगर-दि.१९**

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी अद्याप महायुती मधील जागा वाटप झालेले नाही. तसेच नगर शहर विधानसभा मतदार संघ हा भाजपाला किंवा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळेल हे अद्याप निश्चित नाही. मात्र भरतीय जनता पक्षाने निवडणुकीची जय्यत तयारी सुरु केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचार व प्रसिद्धीचा आढावा घेण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रभारी व गुजरात राज्यातील आमदार महेश कसवाला यांच्या उपस्थितीत शहर भारतीय जनता पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक शुक्रवारी सायंकाळी लक्ष्मी कारंजा येथील पक्ष कार्यालयात संपन्न झाली. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार व प्रसिद्धीसाठी भाजपाच्या वतीने काय काय उपाययोजना राबवायच्या आहेत याबाबत आ. महेश कसवाला यानी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, पंडित वाघमारे, अनिल मोहिते, महेश नामदे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



कासवाला म्हणाले, भारतीय जनता पार्टी ही सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय देणारी पार्टी आहे. पार्टीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्या सारखे सामान्य बुध प्रमुखही आज राष्ट्रीय स्तरावर काम करत आहे हे भाजपचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाची दखल पक्ष घेणारच आहे हे लक्षात ठेवावे. महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी राज्यात पुन्हा सत्ता आणण्यासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे, असे आवाहन करुन सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त संपर्क जनतेशी सुरू करावा, अशा सूचना उपस्थित पदाधिकाऱ्यांना केल्या.

ॲड.अभय आगरकर यांनी प्रभारी आ. महेश कासवाला यांचे स्वागत करून पक्षाचे शहरात सुरू असलेल्या कामाची माहिति दिली. प्रास्ताविक सरचिटणीस सचिन पारखी यांनी केले. आभार महेश नामदे यांनी मानले. यावेळी बाळासाहेब भुजबळ, बाळासाहेब खताडे, मुकुंद गंधे, निशांत दातीर, चंदन बारटक्के, विशाल कर्डिले, दीपक देरेकर, सुजित खरमाळे, वैभव झोटिंग, कैलास गर्जे, अशोक भोसले, सुनील सकट, बाबासाहेब सानप, गोपाल वर्मा, हर्षल बोरा, रेणुका करंदीकर, ज्योती दांडगे, राखी आहेर, पुष्कर कुलकर्णी, करण कराळे, अविनाश वाणी, बंटी डापसे, अमोल निस्ताने, राजेंद्र काळे, मयूर बोचूघोळ, श्वेता पंधाडे, अनिल निकम, सुरेश लालबागे, ज्ञानेश्वर धिरडे, गणेश कानगावकर, नितीन शेलार व रवींद्र बाकलीवाल आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# सारडा महाविद्यालयात जागतिक मानसिक सप्ताह साजरा

**समाचार/नगर-दि.१९**

हिंद सेवा मंडळ संचालित पेमराज सारडा महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग आयोजित जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह निम्मित विशेष कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय नोबेल पीस अवार्ड साठी नामांकित झालेल्या डॉ. सुधा कांकरिया आणि डॉ. दिप्ती मानसशास्त्र तज्ञ डॉ.दीप्ती करंदीकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित होत्या.

डॉ. सुधा कांकरिया यांनी ध्यानधारनेचे मानसिक आरोग्यात असलेले महत्व स्पष्ट केले. त्याचबरोबर लॉ ऑफ अट्रॅक्शन यामध्ये व्यक्ती परिस्थिती आणि वस्तू यांच्याशी कशा पद्धतीने आकर्षिले जातात. तसेच सकारात्मक विचार कसे निर्माण होतात व त्याचा कसा परिणाम होतो त्याबाबतीत मार्गदर्शन केले. तसेच पियानो इफेक्ट चा प्रयोग कशा पद्धतीने विचार निर्मिती करतो अशी माहिती दिली. हार के बी नहारे जीत उसीकी होती है' असे प्रेरणा स्रोत निर्माण करण्याची ताकद व्यक्तीमध्ये असते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. दीप्ती करंदीकर यांनी तर्कसुसंगत भावनिक उपचार पद्धतीविषयी विविध उदाहरणे देवून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा देत याप्रसंगी मनाचे शोल्क यासंदर्भात मन स्वस्थ असेल तर विचार पण चांगले येतात व आपले वर्तनही सकारात्मक होते असे विचार व्यक्त केले. प्रास्ताविक मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. या कार्यक्रमास हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतिलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व प्रबंधक अशोक असेरी यांनी शुभेच्छा दिल्या.

### ५५ पालकांची उपस्थिती; अनेकांनी कथन केले मजेशीर किस्से

# परदेशी पालकांचा नगरमध्ये स्नेहमेळावा

**समाचार/नगर-दि.१९**

नगर मधील ज्या पालकांचे मुले, मुली, सुना व जावई परदेशात आहेत अशा पालकांचा एन आर आय वर्ल्ड ऑफ अहिल्या नगर चा स्नेहमेळावा नुकताच शानदार पद्धतीने पार पडला. मेळाव्यात ५५ पालकांनी उपस्थिती नोंदवली. यांच्या व्हाट्सअप ग्रुपची निर्मिती साडेपाच वर्षांपूर्वी झालेली आहे. प्रास्ताविक प्रा. संगीता भागवत यांनी केले.

डॉ. दत्ता पोंदे यांनी अशा प्रकारचा ग्रुप स्थापन करण्याची काय गरज होती हे सांगितले. या ग्रुप मुळे परदेशी जाणाऱ्या मुला-मुलींच्या प्रवाशासंबंधी, व्हिसा संबंधी, कागदपत्रांसंबंधी किंवा तिथे राहण्याच्या दृष्टीने काही अडीअडचणी निश्चितच या ग्रुप द्वारे दूर होऊ शकतात असे डॉ. पोंदे यांनी सांगितले. अविनाश कुलकर्णी यांनी उपस्थित सदस्यांना भारतातील प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन व डॉक्युमेंटेशन संदर्भात मार्गदर्शन केले. उपस्थित सदस्यांनी ओळख करून दिली व आपली मुले-मुली परदेशात कशी गेली व कुठे गेली याचे अनेक मजेशीर व कौतुकास्पद किस्से सांगितले. पालकांचे न्यूयॉर्क, टेक्सास, कॅलिफोर्निया, शिकागो, युरोप व ऑस्ट्रेलिया असे वेगवेगळे ग्रुप तयार करण्यात आले. त्या त्या भागातील मुलं-मुली असणाऱ्या पालकांनी आपापल्या विचारांची देवाण-घेवाण केली. सविता धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. शहर व जिल्ह्यातील ज्या नागरिकांचे जवळचे नातेवाईक परदेशात आहेत किंवा चालले ते या व्हाट्सअप ग्रुप मध्ये जॉईन होऊ शकतात. त्यांनी डॉ. दत्ता पोंदे यांच्या ७३८७ ९०० ७०० या क्रमांकावर संपर्क साधावा. सामाजिक बांधिलकी जपणारा ग्रुप विनामूल्य आहे. कोणतीही नोंदणी वा सभासद फी नाही,असे यावेळी सांगण्यात आले.




### पाऊलबधे तंत्रनिकेतनमध्ये अब्दुल कलाम यांना अभिवादन

# वाचनानेच माणूस समृद्ध बनतो-प्राचार्य बोर्डे

**समाचार/नगर-दि.१९**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना वाचन व लेखन याची आवड होती. त्यामुळेच त्यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले. तसेच एकूण २४ पुस्तके केवळ विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी लिहिली. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे हा त्यांचा उद्देश होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी केले.




अहिल्यानगर- सोलापूर रोड वरील नारायणडोह येथील डॉ. ना.ज. पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयात डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. जयश्री होले, जाबीर अली प्रा. रेखा रोटे,विश्वनाथ आदवडे, सुदर्शन लोखंडे, शशिकला देवकर, ओसामा सय्यद, राजेंद्र देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेत ऑफलाइन व ऑनलाइन शिक्षण, मोफत व फी भरून शिक्षण, इलेक्ट्रॉनिक मीडिया व पुस्तके, मानव व यांत्रिक मशीन अशा विषयांवर स्पर्धा पार पडल्या.



### जिल्हा वाचनालयाच्या परिसंवादात साहित्यिकांचा आनंदोत्सव

# मराठीच्या वृद्धिसाठी साहित्यिकांचे योगदान महत्वपूर्ण -डॉ. गोविलकर

**समाचार/नगर-दि.१९**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा आज जाहिर झाला असला तरी संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतून नामदेवाच्या असंगातुन मराठी भाषेने गेली अनेक वर्षात जगभरात आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अभिजात मराठी भाषेला मिळालेल्या या बहुमानानंतर मराठी भाषा जगभरातील असंख्य देशातील अंगणात खेळली पाहिजे. यासाठी अनुवादाच्या व तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन मराठी साहित्यीकांचे योगदान महत्वपुर्ण असेल असा आशावाद मराठी सहित्यांच्या जेष्ठ अभ्यासिका व साहित्यीका डॉ.लिलाताई गोविलकर यांनी व्यक्त केला.

नगर जिल्हा वाचनालय व नवयुग चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर साहित्यीक, वाचक यांच्या माध्यमातून वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमा विषयी तसेच आनंदोत्सव साजरा करण्यासाठी आयोजित परिसंवाद प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, कार्यक्रमाचे प्रवर्तक नवयुग चॅरीटेबल ट्रस्टचे प्रमुख संजय पारनाईक, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या व आदिवासी साहित्याच्या अभ्यासिका डॉ.माहेश्वरी गावित, वाचनालयाच्या उपाध्यक्ष दिलीप पांढरे, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, मसपाचे अध्यक्ष किशोर मरकड, कवी चंद्रकांत पालवे,आदींसह असंख्य क्षेत्रातील साहित्यीक उपस्थित होते.प्राचार्य डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांनी इंग्रजी शाळेचे महत्व वाढत असतांना मराठी प्रेमी साहित्यीक वाचक, वाचनालये यांनी तेथे जाऊन त्यांना कथा, कविता, स्पर्धा या माध्यमातुन मराठी वाचनाची गोडी उगवत्या पिढीला लावली तर मराठी ही उखाणे वृद्धीगंत होईल. यासाठी आपण मराठी प्रेमीनी जागल्याची भूमिका घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित यांनी मार्गदर्शन कार्यशाळा, स्पर्धा अशा कृतीशिल उपक्रमाची चळचळ व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करुन सारडा महाविद्याल, अ.नगर जिल्हा वाचनालय, आणि नवयुग ट्रस्टच्या माध्यमातून याची सुरवात लगेचच करु या असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविकात अ.नगर जिल्हा वाचनालयाचे प्रा.शिरिष मोडक यांनी आज नवयुगच्या पुढाकारातुन सुरु होणारी साहित्य विश्वातील क्रांतीकारी चळवळ मराठी भाषेला, साहित्यीक व साहित्य यांना लोकाभिमुख दर्जा प्राप्त करुन देतील असा आशावाद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे संयोजक उद्योजक व नवयुक ट्रस्टचे प्रमुख संजय पारनाइक यांनी उपस्थित साहित्यीकांचे स्वागत केले. याप्रसंगी उद्योजक नवनाथ धुमाळ, डॉ. सुनिल कात्रे, संपादक ज्ञानेश्वर कुलकर्णी, ज्योती केसकर, शिल्पा रसाळ, प्रा.ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, मसपा नगर जिल्हा अध्यक्ष किशोर मरकड, दशरथ खोसे, पक्षीमित्र डॉ.सुधाकर कुर्हाडे, डॉ.वर्षा किर्तने, कवी सुभद्रासुत आंधळे, शब्बीर शेख अहमद बिलाल, सौ. निर्मला मांडे, अरविंद ब्राम्हणे, डॉ.लक्ष्मीकांत येलवंडीकर यांनी आपल्या वैशिष्ट पुर्ण संकल्पणातुन ही चळवळ व्यापक होण्यासाठी मार्गदर्शन केले.यावेळी उद्योजक राजीव गुजर, प्रा.विश्वास काळे, प्रा.आर.जी.कुलकर्णी, किशोर यत्ते, माधवी कुलकर्णी, सखाराम गोरे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा.ग्रंथपाल नितिन भारताल, सावेडी जिल्हा वाचनालयाच्या सारिका देव, संकेत फाटक, पौर्णिमा गायकवाड, साक्षी पद्मा, दिपाली कल्याणम आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन गौरी जोशी, शिल्पा रसाळ, स्वागत प्रा.मोडक, तर आभार ज्योती कुलकर्णी यांनी मानले.

### घोषणाबाजीत रेल्वे प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराचा निषेध

# आष्टी-पुणे रेल्वेसाठी भारतीय जनसंसदेचे आंदोलन

**समाचार/नगर-दि.१९**

आष्टी-नगर-पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्याच्या मागणीसाठी शनिवारी (दि..१९ ऑक्टोबर) शहरातील रेल्वे स्टेशन समोर वंदे मराठवाडा डेमु एक्सप्रेसचा पीपल्स हेल्पलाइन व भारतीय जनसंसदेच्या वतीने सूर्यनामा करुन सुरु रेल्वे प्रशासनातील अनागोंदीचा निषेध नोंदविण्यात आला.

हातात तिरंगा ध्वज घेऊन कार्यकर्त्यांनी आष्टी-नगर-पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्यासंदर्भात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सत्याग्रही मार्गाने झालेल्या आंदोलनात ड. कारभारी गवळी, जाफर भाई (कर्जत), भाऊसाहेब सुद्रिक (कोपर्डी), भारतीय जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, शहराध्यक्ष रईस शेख, प्रकाश थोरात, अशोक भोसले, शाहीर कान्हू सुंभे, बाळासाहेब पालवे, शेख अल्ताफ रहीम, संदेश रफारिया, वीर बहादूर प्रजापती, सुधीर भद्रे, बबलू खोसला, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे, विजय शिरसाठ, राम धोत्रे, सुनिल टाक, अरुण खिची आदी सहभागी झाले होते.




नगर-पुणे अंतर १०५ किलोमीटर आहे. आष्टी-नगर अंतर ६५ किलोमीटर आहे. या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची गेली तीस वर्षापासून कार्यान्वीत करण्याचे काम सुरु आहे. परंतु हा रेल्वे मार्ग आज ही पूर्ण झालेला नाही. मागच्या वर्षी नगर-आष्टी रेल्वे नगर- आष्टी डेमो रेल्वे सुरू झाली, परंतु प्रवाश्यांनी प्रतिसाद दिला नाही. किमान ६० कोटी रुपयांची डेमो गाडी नगरच्या रेल्वे स्टेशनवर गेली अनेक महिने गंजत ठेवण्यात आली आहे. या गाडीवर दररोज अडीच लाखापेक्षा जास्त खर्च होत असल्याचे रेल्वे प्रशासनाचे म्हणने असून, यावरुन एकंदरीत रेल्वे प्रशासनाची अनागोंदीने समोर येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.रेल्वेमंत्री न्याय देण्यासाठी वंदे मराठवाडा आष्टी-नगर-पुणे डेमू ट्रेन युद्ध पातळीवर सुरू करण्याची अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाकडून यासंबंधी कारवाई न झाल्यास रेल्वे मंत्र्यांच्या प्रतिकात्मक पुतळा धावत्या रेल्वे समोर टाकून निषेध नोंदविला जाणार असल्याचा इशारा संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे. या मागणीचे निवेदन रेल्वेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

### रोटरी क्लबचा उपक्रम; मुलींना सायकलींचे वाटप

# सायकलमुळे मुलींचा खडतर प्रवास होणार 'सुकर'

**समाचार/नगर-दि.१९**

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देऊन त्यांना सशक्त बनवण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीने लिटरसीच्या उपक्रमांतर्गत एक प्रेरणादायी योजना राबवली आहे . रोटरी डिस्ट्रिक ३१३२ च्या Bike ४ Education या प्रकल्पाद्वारे नगर जिल्ह्यातील तांदळी वडगाव येथील धर्मनाथ विद्यालयातील पाच गरजू मुलींना नवीन सायकलींचे नुकतेच वाटप करण्यात आले. गतवर्षीच्या अध्यक्ष देविका रेळे यांच्या हस्ते नुकतेच या शालेय विद्यार्थीनींना या सायकल्सचे चे वाटप करण्यात आले .शिक्षण घेण्यासाठी मुलींना रोज दोन तीन किलोमीटर पायपीट करत यावे लागत आहे . सायकल मुळे त्यांना शाळेत येणे जाणे सोयीचे होणार आहे. या सायकलच्या माध्यमातून शाळेमध्ये सायकल बँक तयार करण्यात येणार आहे . ज्या मुलींना सायकली देण्यात आल्या आहेत त्या मुलींनी शाळा



संपल्यानंतर त्या सायकल पुन्हा शाळेत जमा करून शाळेत नव्याने येणाऱ्या गरजू मुलींना त्या देण्यात येणार आहेत, अशी माहिती मीनल बोरा यांनी दिला. हा सायकल वाटपचा उपक्रम गत प्रेसिडेंट प्रेसिडेंट देविका रेळे यांच्या काळातील उपक्रम नूतन प्रेसिडेंट मीनल बोरा यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच राबवला गेला . गत प्रेसिडेंट देविका यांनी मुलींना शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करुन स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल करावे अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी लिटरसी चेअर रो प्रतिभा धूत , रो अनुराधा आठरे , रो सविता काळे , रो विभा तांबडे व आर्किटेक्ट मीनल काळे या उपस्थित होत्या .

तसेच शाळेचे विश्वस्त व इतर ग्रामस्थ उपस्थित होते . शाळेचे माजी मुख्याध्यापक रघुनाथ ठोंबरे हे कार्यक्रमाचे आयोजक होते. सायकल मिळाल्यानंतर विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद रोटरीच्या सदस्यांना त्यांच्या कामाची पावती देऊन गेला . ज्येष्ठ रोटरी सदस्या प्रतिभा धूत यांनी यावेळी शाळेतील शाळेचे मुख्याध्यापक व विश्वस्त यांच्याशी चर्चा करून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या व मदतीचे आश्वासन दिले. शाळेतील शिक्षिका सरोज पवार यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली .सूत्रसंचालन हसीना शेख यांनी केले . या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष शरद घिगे, सचिव भिवसेन घिगे , दूध डेअरीचे अध्यक्ष संतोष घुगे, सेवानिवृत्त सैनिक रमेश दळवी व सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

## क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पोचे शानदार उद्‌घाटन

# 'क्रेडाई'मुळे गरजूंच्या घरांची स्वप्नपूर्ती-आ.जगताप

**समाचार/नगर-दि.१९**

सर्वसामान्यांपासून प्रत्येकालाच स्वतःच्या हक्काच्या घराची इच्छा असते. आयुष्यभर काबाडकष्ट करून कमावलेली रक्कम देऊन स्वप्नातील घर घेतले जाते. अशा वेळी त्यांना विश्वसनीय, गुणवत्ता असलेली घरे क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पो मुळे एकाच छताखाली पहायला मिळतात. क्रेडाई अहमदनगरने सातत्याने प्रॉपर्टी एक्स्पो आयोजित करून अनेकांच्या हक्काच्या घराची स्वप्नपूर्तीत योगदान दिले आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



नगरमधील बांधकाम व्यावसायिकांच्या क्रेडाई संघटनेच्या अहमदनगर शाखेने आयोजित केलेल्या क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ चे शुक्रवारी सायंकाळी सावेडी रस्त्यावरील सारडा महाविद्यालयाच्या जागेत आ. जगताप यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, सह सचिव आशिष पोखर्णा, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या होम लोन चिफ मॅनेजर भूमीजा रावत, क्रेडाई अहमदनगरचे अध्यक्ष अमित मुथा, सचिव प्रसाद आंधळे, क्रेडाई अहमदनगरचे प्रेसिडेंट इलेक्ट गिरीश अग्रवाल, उपाध्यक्ष अमित वाघमारे व सागर गांधी, खजिनदार दीपक बांगर, माजी अध्यक्ष संजय गुगळे, विक्रम जोशी, आर्किटेक्ट मयुर कोठारी, प्रकाश मेहता, कमलेश झंवर, ॲड.जयवंत भापकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना अमित मुथा यांनी सांगितले की, हे प्रदर्शन २० तारखेपर्यंत सुरू राहणार असून यामध्ये बांधकाम साहित्यापासून गृहकर्जासंबंधित एकूण १५० स्टॉल आहेत. प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन हक्काच्या घराचे स्वप्न साकारावे असे आवाहन त्यांनी केले. प्रमोद खैरनार म्हणाले, क्रेडाईच्या नगरच्या टिमचे काम अतिशय नियोजनबध्द असते. प्रॉपर्टी एक्स्पोमधून त्याची प्रचीती येते. भूमिजा रावत म्हणाल्या, क्रेडाईने ग्राहकांसाठी एकाच छताखाली दर्जेदार गृहप्रकल्प आणून निवडीला भरपूर वाव देण्याचे काम केले आहे. स्टेट बँक भविष्यातही अशा उपक्रमांना सहकार्य करेल. आशिष पोखर्णा म्हणाले, अनेकांच्या प्रयत्नातून नगरचा चेहरामोहरा बदलत आहे. नवीन स्कायलाईन तयार होत आहे. काही लाखांपासून ते दोन तीन कोटीपर्यंतचे घरं, प्लॉट याठिकाणी आहेत. याठिकाणी भेट दिल्यावर प्रत्येकाला नगरचे नवीन रूप नक्कीच पहायला मिळेल.

प्रदर्शनात पुण्यातील निवडक बिल्डर्सचेही प्रकल्पही याठिकाणी आहेत. त्यामुळे पुण्यातील प्रकल्पांतही नगरकरांना खरेदी करता येणार आहे. तीन दिवसीय प्रदर्शनात दररोज लकी ड्रॉ काढण्यात येणार असून प्रदर्शनास भेट देणाऱ्यांना आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी असेल.

याशिवाय विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, फूड कोर्ट देखील असणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसाद आंधळे यांनी आभार मानले.

# डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांना मराठी साहित्य संघाचा पुरस्कार

**समाचार/नगर-दि.१९**

राज्यातील साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठित व नावाजलेल्या मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थेच्या वतीने दिला जाणारा हभप कै. दिगंबर भास्कर परुळेकर स्मृती पुरस्कार अहिल्यानगरचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांना जाहीर झाला आहे. संस्थेच्या वतीने गेल्या ९९ वर्षांपासून संत साहित्य क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या अभ्यासू साहित्यिकांना हा प्रतिष्ठित पुरस्कार दिला जातो. शनिवार दि.२६ ऑक्टोबर रोजी मुंबई मराठी साहित्य संघाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे



वितरण होणार आहे.

माजी प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी आजपर्यंत संत साहित्यावर ८० हुन अधिक ग्रंथ व साहित्य लिहिले आहे. त्यांना याआधी अकोले येथील अगस्ती देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा कृतज्ञता गौरव पुरस्कार, १९९२ साली कांचीकाम कोठी पीठाचे शंकराचार्य यांनी ज्ञानेश्वरी विद्वत पुरस्कारासाठी डॉ.सहस्रबुद्धे यांना दिला होता.

श्रीगोंदाच्या शेख महंमद महाराज ट्रस्टच्या वतीने संत सेवा पुरस्कार, तसेच राज्य शासनाचा तत्त्वज्ञाना विषयी दिला जाणारा ना.गो.नांदापुरकर पुरस्कार आदि राज्यस्तरीय प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्तझालेआहेत. डॉ.सहस्रबुद्धे यांनी आजपर्यंत केलेल्या संत साहित्याच्या अभ्यासाची दखल घेवून मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने मानाचा परुळेकर स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


**REQUIRED IMMEDIATELY - AHILYANAGAR**

Well-known Coaching Institute

**Marketing - 5** experience preferred

**Telecaller - 4** 1-2 years exps.

**Accountant - 2** - Tally must/ 1-2 yrs. exps.

**Faculty for All Subjects** (8th to 10th) **- 5 Post**

More Details Call & Share Resumes on : **7722001141/42**

**CHANGE IN NAME**


MY PREVIOUS NAME WAS **SINDHU DHONDIRAM DATE.** MY NEW NAME IS **SINDHUBAI MUKUND BAHIRAT**. IT WILL BE USED FOR ALL FUTURE PURPOSES.

AADHAR CARD NO. 853836032310

**चुकीची दुरूस्ती**

सोमवार दि.१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकात जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, अ.नगर या जाहिरातीमध्ये **एएनएम** या पदासाठी **दिव्यांग (पीडब्ल्यूडी)** या रकान्यात **जागा २** आहेत. **खुला १ व इमाव १ जागा** असे वाचावे, ही विनंती.

**SASE DCORATERS**




Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

**दिनांक - १८ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२४**



| | |
|---|---|
| सिंघम (हिंदी) | 11.30 AM |
| THE WILD ROBOT (3D) | 12.00 PM<br>05.00 PM |
| विकी विद्या का वो वाला व्हिडिओ | 08.30 AM<br>01.45 PM<br>10.15 PM |
| फुलवंती | 04.45 PM |
| VETTAIYAN | 08.30AM<br>10.30 PM |
| DEVARA-1 | 07.15 PM |
| लाईक आणि सबस्क्राईब | 02.15 PM |
| जिगरा | 09.00 AM<br>02.00 PM<br>07.00 PM |
| पाणी | 04.55 PM<br>10.10 PM |
| BINNY & FAMILY | 07.30 PM |
| राजा राणी | 11.15 AM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show **CONNPLEX** AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.

Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002



Rashtrasant Janardhan Swami Foundation, Kopargaon.

**Rashtrasant Janardhan Swami College of Nursing, Kopargaon**

(Affiliated to MUHS, Nashik)

Mumbai - Nagpur Highway, Kokamthan, Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar Maharashtra – 423601
Website: - www.rjsgi.com Mobile: - 9961133013 / 7907565939
Office :- 8605076865 E-Mail :- rajaswanursing@gmail.com

**ADMISSION FOR 2024-25 B.Sc. (N) (BACHELOR OF NURSING)**

**As per MH Nursing CET Brochure-2024 to give admission to the eligible students in the college level after the cap round (Institute Level Round)**

**Vacancy Position for Institutional quota (State Quota)**

| Sr. No. | Caste/Category | Number of seat |
|---|---|---|
| 1 | ST | 1 |
| 2 | EWS | 1 |
| 3 | Open (Women) | 1 |

**Institutional Level Round Academic Year 2024-25 For Admission to BSc Nursing Course**

**Schedule for Institutional Level Round for Private Unaided B.Sc. Nursing Colleges for Academic Year 2024-25.**

| Sr. No. | Activity | Dates |
|---|---|---|
| 1. | List Of Vacancy Published | 17/10/2024 |
| 2. | The eligible candidate must apply in person to the respective college | 18/10/2024 to 21/10/2024 up to 05.00 pm |
| 3. | Publication of General Merit List | 22/10/2024 by 06.00 pm |
| 4. | Physical joining of candidates from Selection List-1 | 23/10/2024 to 25/10/2024 up to 05.30 pm |
| 5. | After The First List The Second List Vacancy is Published | 25/10/2024 up to 06.30 pm |
| 6. | Physical joining of candidates from Selection List-2 | 26/10/2024 to 28/10/2024 up to 05.30 pm |
| 7. | Publication of joining of candidates from Selection List-3 | 28/10/2024 up to 06.30 pm |
| 8. | Physical joining of candidates from Selection List-3 | 29/10/2024 to 30/10/2024 up to 05.30 pm |
| 9. | Reporting of admitted Candidates in College Feedback Module. | 31/10/2024 up to 11.59 pm |
| 10. | Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for A.Y. 2024-25 | 31/10/2024 |

Note: Cut-off date of admission for B. Sc. Nursing Course is 31.10.2024.

Principal

Rashtrasant Janardhan Swami College of Nursing Kopargaon.












२१ वर्षांची पर्यटन परंपरा

**चैतन्य पब्लिसिटी**

**ट्रॅव्हल्स् व इन्शुरन्स**

KESARI

संचालक - पत्रकार किशोर मरकड

- ऑनलाईन एअर व रेल्वे तिकेट
- देश-विदेशातील हॉटेल बुकींग
- पासपोर्ट व व्हिसा मार्ग/धार्मिक टूर बुकींग
- सर्व न्यूज पेपर व चॅनल ॲडव्हर्टायझिंग
- देश-विदेशातील टुर्स बुकींग.
- केसरी टूर्सचे बुकींग
- स्वतंत्र सहलींचे आयोजन.

रेनबो हाऊस, सावेडी रोड,अ.नगर.

9422222431, 7350553131